दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे | अंक –२७८ | बुधवार दि.१७ जुन २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-278 | Wednesday, Dt.17 June 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## इन बॉक्स

### शासनाचे जनहितार्थ निर्णय...

### दुग्धजन्य पदार्थांना बाजारपेठ मिळणार – मुख्यमंत्री

मुंबई : ग्रामीण भागातील दुग्धजन्य पदार्थ आणि अन्य कृषी उत्पादने मोठ्या बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्यासाठी 'मुंबई मेट्रो' हे मोठे आणि प्रभावी माध्यम आहे. यामुळे निश्चितच ग्रामीण भागातील उत्पादनांना मुंबईमध्ये हक्काची बाजारपेठ उपलब्ध होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो स्टेशन स्थानकावर वारणा सहकारी दूध उत्पादक संघाच्या दुग्धजन्य पदार्थ विक्री स्टॉलच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. दुग्धविकास मंत्री अतुल सावे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, वारणा समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे (सावकर), मुंबई महापालिका आयुक्त तथा मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे,तसेच वारणा सहकारी दूध उत्पादक संघाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

### बायोकेमिस्ट्री ब्लड अनालायझर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत मुंबईतील लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय (सायन रुग्णालय) येथे अत्याधुनिक, पूर्णपणे स्वयंचलित बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझर उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अत्याधुनिक यंत्रणेमुळे रुग्णांना जलद आणि अचूक निदान सेवा मिळणार असून उपचार प्रक्रियेलाही गती मिळणार आहे.

### राज्यात नव्या प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या स्थापनेसाठी निकष निश्चित

मुंबई : महाराष्ट्रात वाढती वाहनसंख्या, नागरिकांची वाढती गरज आणि प्रशासनावरील ताण लक्षात घेऊन नवीन प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालये स्थापन करण्यासाठी निकष निश्चित करण्यात आले आहेत. नागरिकांना परिवहन विभागाच्या सेवा अधिक जलद, सुलभ आणि त्यांच्या जवळ उपलब्ध करून देण्याचा उद्देश असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक सांगितले. परिवहन विभागाने यासाठी नियुक्त केलेल्या तज्ज्ञ समितीचा अहवाल शासनाकडे पाठविला असून, त्यामधील शिफारसींना तत्त्वतः मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

### फिल्मसिटीकडून मराठी लघुपट व माहितीपटांचे आयोजन

मुंबई : मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६ च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या वतीने मराठी भाषेतील निवडक १९ लघुपट आणि माहितीपटांचा विशेष महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन मंगळवार, १६ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या लघु नाट्यगृहात होणार आहे.

हा महोत्सव १६ ते २० जून २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ६.३० वाजता रंगणार असून, १९ जून रोजी मात्र सायंकाळी ४ ते ६ या वेळेत चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील नवोदित आणि प्रस्थापित दिग्दर्शकांच्या कलाकृतींना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

### यशस्वी खरीप हंगामासाठी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब आवश्यक

मुंबई : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात कोल्हापूर जिल्ह्याचे कृषी उपसंचालक नामदेव परीट यांची 'खरीप हंगाम विशेष' मुलाखत प्रसारित होणार आहे. यामध्ये खरीप हंगामाची पूर्वतयारी, बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पीक नियोजन, प्रमाणित बियाण्यांची निवड, संतुलित खत व्यवस्थापन, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर तसेच कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांविषयी ते सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.

### भारतनेटसाठी महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडची स्थापना

मुंबई – ग्रामपंचायत स्तरापर्यंत ऑप्टिकल फायबरद्वारे सक्षम व दर्जेदार ब्रॉडबॅण्ड बॅकबोनची उभारणी करून राज्यात सुधारित भारतनेट कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी 'महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (एमडीआयएल) विशेष हेतू कंपनी (एसपीव्ही) स्थापन करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.या विशेष हेतू संस्थेचे डिजिटल भारत निधीचे प्रशासक हे अध्यक्ष असतील तर , ग्रामविकास, वित्त, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, महसूल व वन विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव अथवा प्रधान सचिव सदस्य राहतील. त्याचबरोबर राज्य शासनाद्वारे सदस्य सचिवाची नियुक्ती केली जाईल. या शिवाय केंद्र सरकारकडून चार वरिष्ठ अधिकारी सदस्य म्हणून नामनिर्देशित केले जातील.

# माहिती व जनसंपर्काला स्वतंत्र ओळख

# फडणवीस मंत्रिमंडळाचा ऐतिहासिक निर्णय..!

## राज्यात आता ४६ स्वतंत्र विभाग, निर्णय प्रक्रियेला मिळणार नवी गती..!!

मुंबई । विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक इतिहासात महत्त्वपूर्ण ठरणारा निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत माहिती व जनसंपर्क विभाग आणि राजशिष्टाचार विभाग यांना स्वतंत्र विभागांचा दर्जा देण्यास मंजुरी देण्यात आली. यामुळे आतापर्यंत सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीत असलेले हे दोन्ही घटक आता स्वतंत्रपणे कार्यरत राहणार असून, राज्याच्या प्रशासनिक रचनेत नवे पर्व सुरू होणार आहे.

राज्य शासनाच्या योजना,

पान २ वर...





**– ठळक निर्णय –**

✲ माहिती व जनसंपर्क विभागाला स्वतंत्र मंत्रालयीन दर्जा ✲ राजशिष्टाचार विभाग स्वतंत्रपणे कार्यरत ✲ राज्यातील प्रशासकीय विभागांची संख्या ४६ वर ✲कृषी, सहकार, उद्योग, महसूल, शिक्षण, पर्यटन आदी विभागांची पुनर्रचना ✲ निर्णय प्रक्रियेत वेग आणि प्रशासनात अधिक सुसूत्रता अपेक्षित ✲ जनतेशी संवाद अधिक प्रभावी होणार शासनाच्या धोरणांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यात माहिती व जनसंपर्क विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्वतंत्र विभाग निर्मितीमुळे शासन-प्रशासन, माध्यमे आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सशक्त होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**जनाभिमुख शासनव्यवस्थेकडे टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल..**

प्रशासनातील ही पुनर्रचना केवळ विभागांची संख्या वाढविणारी नसून कार्यक्षम, गतिमान आणि जनाभिमुख शासनव्यवस्थेकडे टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिली जात आहे. या निर्णयाचा परिणाम भविष्यात कितपत होतो हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

# टिंकलिंग स्टार स्कूलने शाळेची फी भरली नाही म्हणून विद्यार्थ्याचा टीसी रोखला

## मुलाचे वर्ष वाया गेल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करणार – गजानन कदम

बीड /प्रतिनिधी

शहरातील टिंकलिंग स्टार स्कूलमध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला (टीसी) फीच्या कारणावरून रोखून धरल्याचा आरोप करण्यात आला असून या प्रकरणी शिवसेना बीड शहर प्रमुख गजानन कदम यांनी शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार दाखल करून चौकशी व कारवाईची मागणी केली आहे.



भार्गव नितीन खुरणे हा विद्यार्थी टिंकलिंग स्टार स्कूलमध्ये इयत्ता पाचवीमध्ये शिक्षण घेत आहे. संबंधित विद्यार्थ्यांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याने संबंधित सदर शाळेची वार्षिक फी सुमारे रु. २८,०००/- असून. त्यातील अर्धी फीस (१५०००/-रु.) जमा केली असुन आर्थिक परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असल्यामुळे सदर उरलेली रक्कम (१३०००/- + २०००/- पॅनल्टी असे एकुण १५०००/-) फी भरणे पालकास शक्य होत नसल्यामुळे त्यांनी आपल्या मुलाचा प्रवेश इतर शाळेत घेण्याचा निर्णय घेतला.यासाठी विद्यार्थ्याच्या पालकांनी शाळेकडे शाळा सोडल्याचा दाखला (टीसी) मिळण्यासाठी अर्ज केला असता, संपूर्ण वार्षिक फी व त्यावरील दंडाची रक्कम भरल्याशिवाय टीसी देण्यात येणार नसल्याचे शाळा प्रशासनाने सांगितल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.या संदर्भात शिवसेना बीड शहर प्रमुख गजानन कदम यांनी शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी तसेच संबंधित प्रशासकीय यंत्रणांकडे निवेदन सादर करून प्रकरणाची तात्काळ चौकशी करण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्याचा शिक्षणाचा मूलभूत हक्क अबाधित ठेवत त्यास त्वरित टीसी उपलब्ध करून देण्यात यावा तसेच दोषी आढळल्यास संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी

पान २ वर...



## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बडीबडी येथे प्रवेश उत्सव उत्साहात साजरा

माजलगाव /प्रतिनिधी

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, बडीबडी येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच शालेय पुस्तकांचे वाटप करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विलासराव खेत्री हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख गणेश गिरी सर उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक टी. एन. शिंदे सर, ढवळे सर, टाकणखार सर, व्यवहारे सर, शिंदे सर, पवार सर, गुळवे मॅडम, बडवे

पान २ वर...

## आ. धनंजय मुंडे यांचे स्पष्ट निर्देश ; श्रावणापूर्वी परळीतील ८४ खोल्यांचे भक्तनिवास होणार सुरू !



**भक्तनिवासाच्या उर्वरित कामांचा कंत्राटदाराला सोबत घेत सर्व संबंधितानी घेतला आढावा**

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या परळी वैजनाथ येथे दर्शनासाठी येणाऱ्या लाखो शिवभक्तांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेले ८४ खोल्यांचे सुसज्ज भक्तनिवास आगामी श्रावण महिन्यापूर्वी सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्या निर्देशानंतर संबंधित यंत्रणांनी भक्तनिवासाच्या उर्वरित कामांचा आढावा घेत नियोजन निश्चित केले आहे.

परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत माजी मंत्री धनंजय मुंडे व ना. पंकजा मुंडे यांच्या प्रयत्नातून निधी प्राप्त झाला होता. या निधीतून विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. मात्र, विविध कारणांमुळे पोलीस स्टेशनजवळ उभारण्यात आलेले ८४ खोल्यांचे भक्तनिवास अपूर्ण अवस्थेत पडून आहे.या पार्श्वभूमीवर ही बाब धनंजय मुंडे यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्यानंतर त्यांनी तात्काळ दखल

पान २ वर...

# अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेणे कायदेशीर गुन्हा, ७ वर्षांच्या शिक्षेची तरतूद

## उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांचा तरुणाईला इशारा

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

प्रेम भावनांचा आदर करा, परंतु कायद्याची चौकट ओलांडून अल्पवयीन मुला-मुलींना फूस लावून पळवून नेणे किंवा त्यांच्यासोबत पळून जाणे हा गंभीर कायदेशीर गुन्हा आहे, असा स्पष्ट इशारा बीडच्या अंबाजोगाई येथील उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांनी दिला आहे. जिल्ह्यातील तरुण पिढीला कायद्याची जाणीव करून देण्यासाठी बीड जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने अंबाजोगाई उपविभागात एक विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. 'प्रेम असू दे... पण निर्णय समजदारपणाचा असूदे' असा महत्त्वपूर्ण संदेश देत पोलिसांनी प्रामुख्याने तरुणाईला सतर्क केले आहे.देशात लागू झालेल्या नव्या कायद्यानुसार, म्हणजेच भारतीय न्याय संहिता (बी एन एस) च्या कलम १३७(२) अन्वये अल्पवयीन मुलीला फूस लावून, पळवून नेणे किंवा तिच्यासोबत पळून जाणे हा अतिशय गंभीर आणि दंडनीय गुन्हा मानला गेला आहे. या गुन्ह्यासाठी कायद्यात तब्बल ७ वर्षांपर्यंतच्या कडक कारावासाची आणि दंडाची तरतूद करण्यात आली आहे. एका चुकीच्या निर्णयामुळे संपूर्ण आयुष्याची कशी धूळधाण उडू शकते, याकडे पोलिसांनी या मोहिमेच्या माध्यमातून लक्ष वेधले आहे. अशा गुन्ह्यांमध्ये अडकल्यास तरुणांवर पोलीस केस होऊन कायमचा गुन्हेगारी रेकॉर्ड तयार होतो, ज्यामुळे शिक्षण, नोकरी आणि भविष्यातील चांगल्या संधींवर कायमची संक्रांत येते.या समस्येचे कौटुंबिक आणि मानसिक परिणामही गंभीर आहेत. अशा घटनांमुळे कुटुंबांचा समाजातील मान-सन्मान धुळीस मिळतो, तर दुसरीकडे नात्यांमध्ये कायमची



पान २ वर...

# फडणवीस सरकारच्या फसव्या पीक कर्जमाफी विरोधात शिवसेनेचा भर उन्हात एल्गार

## बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅलीने सरकारला घाम फोडला – जिल्हाप्रमुख गणेश वरेकर



बीड /प्रतिनीधी

फडणवीस सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही शेतकऱ्यांसाठी दिलासा नसून फसवणुक आहे. यामधील नियम,अटी,शर्ती या जाचक आहेत. भाजपा हा जुमलेबाज पक्ष आहे व फडणवीस सरकारची कर्जमाफी फसवी असल्याचा आरोप जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी गर्जना महामोर्चात केला.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने, आ.अंबादासदादा दानवे यांच्या मार्गदर्शनाने व जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या नेतृत्वात व बीड तालुकाप्रमुख गोरखआण्णा शिंगण,

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय....

# ममतादीदींच्या शरणागतीचे आश्चर्य

ममतांना राष्ट्रीय राजकारणात आधार हवा आहे. एका पराभवातच लढाऊ ममतादीदींनी शरणागती पत्करल्याचे आश्चर्य वाटते. काँग्रेसच्या नेतृत्वालाही आधार हवाच आहे. एकंदरीत काय, 'सटवाईला नाही नवरा, म्हसोबाला नाही बायको' ही म्हण प्रत्यक्षात येताना दिसते आहे.

पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पार्टीने मिळवलेल्या दणदणीत विजयानंतर राष्ट्रीय राजकारणाचे संदर्भ झपाट्याने बदलले आहेत. तृणमूल काँग्रेसच्या आमदार, खासदारांनी ममता बॅनर्जींच्या नेतृत्वाविरुद्ध उघड बंड पुकारल्यावर देशातील समस्त विरोधकांच्या शिडातील हवाच निघून गेली आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवारांची राष्ट्रवादी आणि ममतांची तृणमूल या दोन काँग्रेसचे सोनिया-राहुलच्या काँग्रेसमध्ये विलीनीकरण होण्याबाबतच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. ममता आणि पवार या दोघांनी वेगवेगळ्या कारणांसाठी काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. पवारांनी १९९९ मध्ये सोनिया गांधींच्या विदेशी नागरिकत्वाचा मुद्दा उपस्थित करून बंडाचे निशाण रोवले. सोनिया निष्ठावानांनी पवार, संगमा, तारिक अन्वर या तिघांची हकालपट्टी केली. पवारांच्या राष्ट्रवादीची १० जून १९९९ ला स्थापना झाली. या २६ वर्षांत १५ वर्षांतले काँग्रेस-राष्ट्रवादी सरकार, १० वर्षे केंद्रातले कृषिमंत्रीपद, २०१९ मध्ये उद्धव ठाकरेंच्या दगाबाजीनंतर राज्यातले मविआ सरकार एवढाच पवारांचा प्रगती आलेख आहे. उद्धव ठाकरेंच्या दगाबाजीनंतर व २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील मविआच्या यशानंतर पवारांच्या ताकदीविषयी पुन्हा भरभरून बोललं जाऊ लागलं होतं. विधानसभा निवडणूक निकालानंतर मात्र पवार यांच्याबरोबर उबाठाचाही फुगा फुटला. त्या आधी पवार जणू भाजपाला संपवूनच निवृत्त होणार असे वातावरण तयार केले गेले होते. शरद पवार कळायला तुम्हाला शंभर जन्म घ्यावे लागतील असे खा. संजय राऊत वारंवार तुच्छतेने म्हणत होते. उद्धव ठाकरेंनी भाजपचा विश्वासघात करून काँग्रेस, राष्ट्रवादीशी पाट लावण्याची तयारी सुरू केली होती. या तिघांचे सरकार स्थापण्यात सोनिया गांधी प्रारंभी अनुकूल नव्हत्या. परिणामी सरकार स्थापनेत विलंब झाला होता. अशात पहाटेचा शपथविधी झाला. दादा पुन्हा 'साहेबां'च्या पंखाखाली आले. नरेंद्र मोदी, अमित शहा, देवेंद्र फडणवीस, भाजप यांची कशी जिरली याच्या कहाण्या पत्रकारांच्या लेखणीतून, वाणीतून रंगवून सांगितल्या जाऊ लागल्या. त्यावेळी राऊतांनी कमालीच्या गुर्मीमध्ये 'काका महिमा' वर्णन करताना 'साहेब कळायला शंभर जन्म घ्यावे लागतील', असे म्हणत भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाची, राज्य नेतृत्वाचा अपमान करण्याची संधी सोडली नव्हती. हेच वाक्य राऊतांनी चार वर्षांनी २०२३ मध्ये पुन्हा उच्चारले होते. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत मविआ ला ३२-३३ जागा मिळतील अशी भविष्यवाणी पवारांनी केली होती. ही भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरली होती. त्यानंतर पवारांचा भाव एकदम वधारला होता. सुजल्यावर कळतं...पवारांनी मारलं कुठे यासारखे फलक झळकू लागले होते. उतारवयात पवारांना पुन्हा हुकमाचा एक्का बनून केंद्रातले मोदी सरकार चुटकीसरशी पाडणार अशा बढाया त्यांचे राऊतांसारखे झिलकरी खासगीत, जाहीरपणे मारू लागले होते.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात मविआ सत्तेत येणार आणि पवार ठरवणार तोच मुख्यमंत्री बनणार, अशी हवा तयार केली गेली होती. निकालाच्या आदल्या दिवशी पवारांनी आपले आमदार मुंबईत आणण्यासाठी विमान, हेलिकॉप्टर तयार ठेवले असल्याचे जाहीरपणे सांगितले होते. मविआचा ससा आपण जिंकणारच या मस्तीत होता. पण विधानसभा निवडणुकीत 'परिवार' एकजुटीने कामाला लागला आणि महायुतीचे कासव विक्रमी जागा जिंकून गेले. तेव्हापासून पवारांचा चडफडाट अनेक वेळा दिसून आला. मरकटवाडीत फेरमतदान घेण्याची आचरट मागणी करणे, सरकारी यंत्रणा, मतदारयाद्यांवर शंका घेणे, पवारांचे वैफल्य वारंवार जाणवू लागलं होतं. ८० च्या दशकात ज्या पिढीने लढणारे पवार पाहिलेत त्यांना असे 'रडणारे' पवार पचत नव्हते. पालिका निवडणुका आल्या... काका बारामतीत सुद्धा गेले नाहीत... लेकही पालिका निवडणुकीत बारामतीमध्येही शांत होती. काकांनी पुतण्याला पुढे चाल दिलीय असे बोलले जात होते. पण विश्वास बसत नव्हता. महापालिका निवडणुकीचे अर्ज भरण्याची शेवटची तारीख जवळ आली तरी पवार मविआबरोबर जाणार की स्वतंत्र लढणार हे जाहीर केले नव्हते. त्यावेळी पवारांनी अजितदादांच्या पक्षाबरोबर अनेक ठिकाणी आघाडी करून लढले. त्यावेळी पवार कळायला तुम्हाला शंभर जन्म घ्यावे लागतील हे संजय राऊतांचे गुर्मीतले शब्द पुनः पुन्हा आठवत होते. परवाच विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचा पाठिंबा मागण्यासाठी सुप्रिया सुळे काँग्रेस भवनमध्ये गेल्या आणि दुसरीकडे पवारांनी अजितदादांच्या पक्षाच्या विक्रम काकडेंना पाठिंबा देण्याची घोषणाही करून टाकली. याच काँग्रेसने पवारांना राज्यसभेवर पाठवण्यासाठी आपला उमेदवार रिंगणात उतरवला नव्हता. पवार अनेकदा काँग्रेस नेतृत्वाला लाथाडतात तरीही काँग्रेस नेतृत्व पुनः पुन्हा त्यांच्यापुढे नमते घेते. अजितदादांच्या पक्षात विलीन होण्याचे अनेक प्रयत्न असफल ठरल्यानंतर पवारांच्या शिलेदारांची अस्वस्थता कमालीची वाढली आहे. हे शिलेदार केव्हा सोडून जातील याचा नेम नसल्यानेच पवारांनी पुन्हा काँग्रेसबरोबर पाट लावण्याचा प्रस्ताव स्वीकारला असू शकतो. ममतांना राष्ट्रीय राजकारणात आधार हवा आहे. एका पराभवातच लढाऊ ममतादीदींनी शरणागती पत्करल्याचे आश्चर्य वाटते. काँग्रेसच्या नेतृत्वालाही आधार हवाच आहे. एकेकाळी सत्तेत असताना परस्परांवर कुरघोडी करण्यास मागेपुढे न पाहणारे हे पक्ष व नेते आज सत्ता नसल्याने हतबल झाले आहेत. एकंदरीत काय, 'सटवाईला नाही नवरा, म्हसोबाला नाही बायको' ही म्हण प्रत्यक्षात येताना दिसत आहे.

### टि सी हरवली आहे
मिझबिग साद शकील या नावाची ११ वी विज्ञान शाखेची टि.सी गुळज ते गेवराई प्रवास दरम्यान हरवली आहे सापडल्यास संपर्क करा
मो.७४९८६ ६००७४

### टि सी हरवली आहे
कोल्हे अमोल विष्णू यांचा १० वी पास चा टी.सी. हरपला आहे. अंबड ते गेवराई रोड हरपला आहे कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर वर संपर्क साधा.
अमोल कोल्हे.
+९१७७७६८४७४१४

### टि सी हरवली आहे
आर्यश जयप्रकाश बांगर या नावाचा १२ वी पासचा दयानंद कॉलेज लातूर चा टीसी बीड बस स्टँडवरून प्रवासाला जाताना हरवला आहे.
सापडल्यास संपर्क
**आर्यश बांगर,भक्ती कन्स्ट्रक्शन,बीड**
**मोबाईल नंबर - ९६८९३ ३१३३३**

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत घोडेबाजाराचा कलंक

## लोकशाहीचा लिलाव कधी थांबणार?

बीड - महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर पुन्हा एकदा घोडेबाजार हा शब्द चर्चेत आला आहे. जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची मते, निष्ठा आणि विचारधारा यांचा बाजार भरत असेल, तर ती लोकशाहीसाठी अत्यंत धोक्याची घंटा आहे. दुर्दैवाने, अनेक ठिकाणी अध्यक्ष, सभापती, महापौर किंवा अन्य पदांच्या निवडणुकांवेळी कोट्यवधी रुपयांचे व्यवहार, दबावतंत्र आणि राजकीय सौदेबाजीच्या चर्चा उघडपणे होताना दिसतात.

लोकशाहीत मतदार हा राजा मानला जातो. परंतु निवडणूक संपल्यानंतर काही लोकप्रतिनिधी जनतेच्या विश्वासाला तिलांजली देऊन स्वतःच्या राजकीय किंवा आर्थिक फायद्यासाठी भूमिका बदलतात. जनतेने एका विचारसरणीवर विश्वास ठेवून निवडून दिलेले प्रतिनिधी काही दिवसांतच दुसऱ्या गोटात जात असतील, तर तो केवळ पक्षांतराचा विषय नसून मतदारांच्या विश्वासघाताचा गंभीर प्रकार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था या ग्रामीण व शहरी विकासाचा कणा मानल्या जातात. रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधा यांचे नियोजन येथे होते. मात्र विकासाच्या प्रश्नाऐवजी सत्तेच्या खुर्चीसाठी सुरू असलेली पैशांची उधळण आणि आमदार- खासदारांपेक्षाही मोठ्या प्रमाणावर होणारी सौदेबाजी चिंताजनक आहे. जनतेच्या करातून उभ्या राहिलेल्या व्यवस्थेचा वापर जर सत्तेचा बाजार मांडण्यासाठी होत असेल, तर तो लोकशाहीवरील सर्वात मोठा आघात आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे अशा प्रकारांविषयी सर्वसामान्य नागरिकांमध्ये हळूहळू उदासीनता निर्माण होत आहे. हे तर नेहमीच होतं अशी मानसिकता लोकशाहीसाठी घातक आहे. चुकीच्या गोष्टींचे सामान्यीकरण म्हणजे भ्रष्टाचाराला अप्रत्यक्ष मान्यता देणे होय. समाजाने, माध्यमांनी आणि न्यायव्यवस्थेने याविरोधात अधिक जागरूक भूमिका घेण्याची गरज आहे.

घोडेबाजाराला आळा घालण्यासाठी कायद्यांची कठोर अंमलबजावणी, मतदान प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि दोषींवर तात्काळ कारवाई आवश्यक आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे राजकारणात नैतिकतेचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे. सत्ता ही जनसेवेचे साधन आहे, व्यापाराचे माध्यम नव्हे, ही जाणीव प्रत्येक लोकप्रतिनिधीने ठेवली पाहिजे.

लोकशाही विकत घेता येत नाही आणि जनतेचा विश्वास तर अजिबातच नाही. आज गरज आहे ती घोडेबाजाराच्या या कलंकाला कायमचा पूर्णविराम देण्याची. अन्यथा उद्या मतपेटी उरेल, पण लोकशाहीचा आत्मा हरवून जाईल.जनतेच्या मतांचा सन्मान करा, लोकशाहीचा लिलाव थांबवा..!

**- संपादकीय दैनिक समर्थ राजयोग**

पान १ वरून...

## नागपूरला हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रोन प्रकल्पाची स्थापना

नागपूर : येथे हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रोन प्रकल्प (एचईएमसीपी) स्थापन करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या प्रकल्पासाठी ३०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. हा प्रकल्प महाकेअर कंपनीमार्फत राबविण्यात येणार असून, व्यवस्थापनासाठी स्वतंत्र उपकंपनी स्थापन करण्यात येणार आहे.यामुळे कर्करोग निदान, उपचार आणि संशोधनाला चालना मिळेल. त्याचा मध्य भारतातील अनेक शहरातील रुग्णांना उपयोग होऊ शकेल. या प्रकल्पामुळे नागपूर रेडिओफार्मास्युटीकल इनोव्हेशन हब म्हणून विकसित होईल; तसेच वैद्यकीय उपचारांमध्ये अचूकता येणार असून. मध्य भारतातील एकमेव महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. ज्यामुळे गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळणार. यात कर्करोगांशी विविध रोगांचे, आजारांचे निदान करण्यासाठी या प्रणालीचा वापर करता येणार आहे. या सुकाणू समितीमध्ये डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अध्यक्ष असतील. नागपूर महापालिकेचे आयुक्त डॉ. विपीन इटणकर सदस्य सचिव आहेत. वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी, कॅन्सर केअर प्रकल्पाचे डॉ. कैलास शर्मा आणि नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटचे डॉ. आनंद पाठक सदस्य असणार आहेत.

*****

## महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण २०२६ जाहीर

मुंबई - राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी प्रभावी व कायमस्वरुपी उपाययोजनांवर भर देणाऱ्या महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण - २०२६ ला मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणानुसार राज्यात राबविण्यात येत असलेल्या जलजीवन मिशन २.० मधील योजनांच्या देखभाल दुरूस्तीसाठी सर्वंकष असा आराखडा तयार केला जाणार आहे.

*****

## महाराष्ट्र स्वयंचलित प्रणाली धोरण-२०२६ जाहीर

मुंबई : संशोधन व विकास, नवोक्रम, उत्पादन, उपयोजन तसेच देखभाल, दुरूस्ती व पुनर्बांधणी या क्षेत्रात स्वयंचलित प्रणाली राबविता यावी, यासाठी महाराष्ट्र स्वयंचलित प्रणाली धोरण-२०२६ निश्चित करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या धोरणामुळे ड्रोन, रोबोटस, स्वयंचलित वाहन यांच्या निर्मिती क्षेत्राला, तसेच ही उपकरणे चालविता येतील, यासाठीचे प्रशिक्षण, अभियांत्रिकी, तसेच संशोधन विकास प्रकल्पांना चालना मिळणार आहे. यातून या क्षेत्रातील उद्योगांना, त्यासाठीच्या गुंतवणूकीला प्रोत्साहन मिळणार आहे. धोरणामुळे या क्षेत्रात सुमारे २५ हजार कोटींची गुंतवणूक येणे अपेक्षित आहे. तसेच या माध्यमातून एक लाखांहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

*****

## महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता

मुंबई : राज्यात केंद्र पुरस्कृत विकसित भारत - जी राम जी (व्हीबीजीरामजी) योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी विकसित भारत - जी राम जी कायदा, २०२५ या कायद्याशी सुसंगत अशा तरतुदी करण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयामुळे ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती, शाश्वत उपजीविका संधींचा विस्तार तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार असून विकसित भारताच्या संकल्पनेला बळकटी मिळणार आहे.

*****

## जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गासाठी राखीव जागांवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदत वाढ मिळणार आहे. याबाबतच्या अधिनियमात तशी सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

पान १ वरून...

### अल्पवयीन मुलींना...

दरी निर्माण होते. कायद्याच्या कचाट्यात सापडल्यानंतर तरुणांना तीव्र मानसिक ताण, नैराश्य आणि पश्चात्तापाचा सामना करावा लागतो, तर दुसरीकडे अल्पवयीन मुलींचे संपूर्ण भविष्य आणि शिक्षण धोक्यात येते.उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांनी तरुणांना आवाहन करताना सांगितले की, वयाच्या या टप्प्यावर भावनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. शिक्षण, करिअर आणि स्वतःचे ध्येय पूर्ण करण्याला तरुणांनी पहिले प्राधान्य दिले पाहिजे. कोणत्याही प्रकारची समस्या, मानसिक गोंधळ किंवा दडपण असल्यास तरुणांनी तात्काळ आपल्या घरातील विश्वासू व्यक्ती, शिक्षक किंवा थेट पोलिसांशी संपर्क साधून मार्गदर्शन घ्यावे. या प्रक्रियेत पालकांची भूमिका महत्त्वाची असून त्यांनी मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद ठेवावा. मुलांच्या बदलत्या वागणुकीवर, त्यांच्या ऑनलाईन हालचालींवर आणि मोबाईलच्या वापरावर पालकांनी बारीक पण विश्वासाचे लक्ष ठेवावे, जेणेकरून मुलांचे भविष्य सुरक्षित राहील असे आवाहन शिंदे यांनी नमूद केले आहे.

### माहिती व जनसंपर्काला...

धोरणे आणि विकासकामे जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला स्वतंत्र विभागाचा दर्जा मिळाल्याने या यंत्रणेची कार्यक्षमता, निर्णयक्षमता आणि जबाबदारी अधिक प्रभावी होणार आहे. राज्यातील सात विभागीय कार्यालये, नागपूर येथील संचालक कार्यालय, नवी दिल्ली व पणजी येथील महाराष्ट्र परिचय केंद्रे तसेच सर्व जिल्हा माहिती कार्यालये यांचे कामकाज आता अधिक गतिमान होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

विशेषतः आपत्ती व्यवस्थापन, शासनाच्या जनकल्याणकारी योजना, विकासकामांची प्रसिद्धी, नागरिकांशी संवाद आणि माध्यमांशी समन्वय यामध्ये माहिती विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. त्यामुळे या विभागाला स्वतंत्र अस्तित्व मिळणे ही केवळ प्रशासकीय पुनर्रचना नसून शासन आणि जनतेमधील संवाद अधिक सक्षम करण्याची दिशा असल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, मंत्रिमंडळाने यापूर्वी मंजूर केलेल्या विभागीय पुनर्रचनेत सुधारणा करत राज्यातील विभागांची संख्या ४५ वरून ४६ करण्यास मान्यता दिली. कृषी, सहकार, उद्योग, महसूल, शिक्षण, पर्यटन, वैद्यकीय शिक्षण आदी विभागांचेही विभाजन करून स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आले आहेत. यामुळे कामकाजातील गुंतागुंत कमी होऊन निर्णय प्रक्रिया अधिक जलद आणि परिणामकारक होईल, असा शासनाचा विश्वास आहे.

### टिंकलिंग स्टार..

निवेदनात करण्यात आली आहे.

'फी वसुलीसाठी कायदेशीर मार्ग उपलब्ध असताना एखाद्या विद्यार्थ्याचा टीसी रोखून त्याचे शिक्षण अडविणे ही गंभीर बाब आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शिक्षण विभागाने तातडीने हस्तक्षेप करावा, असे गजानन कदम यांनी निवेदनात म्हटले आहे.दरम्यान, या प्रकरणात त्वरित कारवाई न झाल्यास शिवसेनेच्या वतीने लोकशाही मार्गाने वेळप्रसंगी शिवसेना स्टाईलने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

### जिल्हा परिषद केंद्रीय....

मॅडम तसेच शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात इयत्ता पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच त्यांना शालेय पुस्तके वाटप करण्यात आली. नव्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर शाळेत प्रवेशाचा आनंद आणि उत्सुकता स्पष्टपणे दिसून येत होती. विद्यार्थ्यांचे स्वागत करताना उपस्थित मान्यवरांनी त्यांना नियमित शिक्षण घेऊन उज्ज्वल भवितव्य घडविण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक टी. एन. शिंदे सर यांनी केले.यावेळी केंद्रप्रमुख गणेश गिरी सर यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डोणे सर यांनी प्रभावीपणे केले. शेवटी व्यवहारे सर यांनी उपस्थित मान्यवर, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

### आ. धनंजय मुंडे यांचे ....

घेत संबंधित कंत्राटदाराला उर्वरित कामे युद्धपातळीवर पूर्ण करून भक्तनिवास वैद्यनाथ देवस्थान समितीच्या ताब्यात देण्याच्या सूचना दिल्या. याअनुषंगाने माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, वैद्यनाथ देवस्थान समितीचे विश्वस्त राजेश देशमुख, गटनेते वैजनाथ सोळंके, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे आणि तीर्थक्षेत्र विकास योजनेचे कंत्राटदार जे. के. कन्स्ट्रक्शनचे संचालक जाफर खान यांनी संयुक्तपणे भक्तनिवासाची पाहणी केली. श्रावण महिना सुरू होण्यापूर्वी भक्तनिवास देवस्थान समितीच्या ताब्यात देण्यासाठी आवश्यक नियोजन यावेळी निश्चित करण्यात आले. कंत्राटदार जाफर खान यांनीही उर्वरित सर्व कामे श्रावणापूर्वी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. भक्तनिवास सुरू झाल्यानंतर परळी येथे दर्शनासाठी येणाऱ्या शिवभक्तांना व भाविकांना अत्यंत माफक दरात निवासाची सुविधा उपलब्ध होणार असून तीर्थक्षेत्राच्या विकासाला चालना मिळणार आहे. यामुळे भाविकांची गैरसोय दूर होऊन धार्मिक पर्यटनालाही मोठी मदत होणार आहे.

### फडणवीस सरकारच्या ...

उपजिल्हाप्रमुख हनुमान गुजर, जिल्हा संघटक रतन गुजर, धारुर तालुका प्रमुख बाबा सराफ, माजी तालुका प्रमुख मदन परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयवर भव्य ट्रॅक्टर रॅली काढण्यात आली.

यावेळी पुढे बोलताना गणेश वरेकर म्हणाले की, फडणवीस सरकार हे घोषणांचा पाऊस पाडुन जनतेला फक्त गाजर दाखवते. आताही शेतकरी कर्जमाफीच्या घोषणेत विवीध नियम, अटी, शर्ती टाकुन फसवी घोषणा फडणवीसांनी केली आहे. या कर्जमाफीचा शेतक-यांना लाभ मिळुच शकत नाही म्हणुन झोपलेल्या सरकारला जागे करण्यासाठी व लबाड सरकारला वठणीवर आणण्यासाठी आजची बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅली आहे.

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, स्टेडीअम कॉम्प्लेक्स पासुन सुरू झालेल्या या रॅलीत भरपुर ट्रॅक्टर, शेकडो शेतकरी, शिवसैनिक आणि पदाधिकारी सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकलेल्या या ट्रॅक्टर रॅलीतुन सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

रॅलीच्या समारोपावेळी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या सह बीड तालुकाप्रमुख गोरख आण्णा शिंगण, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, जिल्हा संघटक रतन गुजर, सहकार सेना जिल्हाप्रमुख गणेश जाधव माजी तालुका प्रमुख अंबाजोगाई मदन परदेशी यांची समायोचीत भाषणे झाली

या रॅलीमधे उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, तालुका सचिव नंदु येवले, उपतालुका प्रमुख ज्ञानोश्वर काशिद, तालुकासहसचिव संदिप भानप, पदवीधर जिल्हा समन्वयक बागवाण सर, युवासेना तालुका प्रमुख बारीकराव येवले, युवानेते मुकेश घुमरे, सर्कलप्रमुख, विभागप्रमुख, शाखाप्रमुख यांच्यासह पदाधिकारी व हजारो शेतकरी उपस्थित होते.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३५७/२०२६**
रूकमिन बहि-विरूध्द निरंक
**(मार्फत-ॲड.एस.एम.शेंबडे)**

ज्याअर्थी मयत नामे **दत्तु पि.एकनाथ बहिर हे दि.०१.०९.२०२१ रोजी मौजे कोळगांव ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.रूक्मीण भ्र.दत्तु बहिर, वय-६५ वर्षे, धंदा-शेती, रा.कोळगांव ता.गेवराई जि.बीड, २. दिगांबर पि.दत्तु बहिर, वय-४५ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, अनिल पि.दत्तु बहिर, वय-४० वर्षे, धंदा-शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **दत्तु पि.एकनाथ बहिर** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२४/०७/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३४४/२०२६ लहानु पि. हरिभाऊ साळवे व इतर वि. निरंक (मार्फत - ॲड.एस.एम. शेंबडे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे कलाबाई भ्र. हरिभाऊ साळवे, रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक २२/११/२०२० रोजी चकलांबा ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ लहानु पि. हरिभाऊ साळवे, वय ६६ वर्षे, धंदा मजुरी, रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ राजेंद्र पि. हरिभाऊ साळवे, वय ६० वर्षे, धंदा मजुरी, रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ रावसाहेब पि. हरिभाऊ साळवे, वय ४८ वर्षे, धंदा मजुरी, रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ४ शोभा भ्र. सुनिल घोरपडे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. मुंगी ता. शेवगाव जि. अहमदनगर, अर्जदार क्र. ५ बबनबाई भ्र. जनार्धन घोरपडे, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. मुंगी ता. शेवगाव जि. अहमदनगर यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत कलाबाई भ्र. हरिभाऊ साळवे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११/०६/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - २१/०७/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३६४/२०२६**
श्रीराम पि.नारायण दिलवाले व इतर वि.निरंक
**(मार्फत-ॲड.एस.बी.बहीर, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **नारायण पि.श्रीपती दिलवाले, रा.उमापुर ता.गेवराई जि.बीड हे दि.०४.१०.२०२५ रोजी रा.उमापुर ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.श्रीराम पि.नारायण दिलवाले, वय-५२ वर्षे, धंदा-घरकाम, रा.उमापुर ता.गेवराई जि.बीड, २.आसाराम पि.नारायण दिलवाले, वय-४८ वर्षे, धंदा-घरकाम, रा.सदर, ३.सिताबाई भ्र.नारायण दिलवाले, वय-७० वर्षे, धंदा-शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **नारायण पि.श्रीपती दिलवाले** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१२/०६/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२२/०७/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३३६/२०२६**
पुष्पाबाई जोगदंड विरूध्द निरंक
**(मार्फत-ॲड.ए.एस.पंडित व ॲड.ए.बी.बांगर)**

ज्याअर्थी मयत नामे **राजेंद्र पि.जिजाराम जोगदंड हे दि.०७.०४.२०२६ रोजी खामगांव ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.पुष्पाबाई भ्र.जिजाराम जोगदंड वय-७८ वर्षे, धंदा-शेती, रा.नवीन नागझरी ता.गेवराई जि.बीड, २.रमाबाई भ्र.राजेंद्र जोगदंड, वय-४० वर्षे, धंदा-शेती, रा.नवीन नागझरी ता.गेवराई जि.बीड, ३.कृष्णा पि.राजेंद्र जोगदंड वय-१७ वर्षे, अ.पा.क.आई अर्जदार क्र.१ रमाबाई भ्र.राजेंद्र जोगदंड रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **राजेंद्र पि.जिजाराम जोगदंड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२३/०७/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# बीडमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाकाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावा - ॲड.गोविंद शिराळे पाटील

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका (बार्शी रोड) दरम्यान गेल्या वर्षभरापासून रखडलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या रस्ता दुरुस्तीच्या संथ कारभारामुळे स्थानिक रहिवासी, व्यापारी आणि वाहनचालकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याची तात्काळ दखल घेण्यात यावी अशा अशायाचे निवेदन लातूर येथील सार्वजनिक बांधकाम विभाग राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता प्रविण भ.सुमांत यांची कर्तव्यदक्ष भाजपा नगरसेवक ॲड. गोविंद नवनाथराव शिराळे यांनी भेट घेवून त्यांना देण्यात आले.

सदर कामांमध्ये गंभीर त्रुटी आढळून येत असून ज्यामध्ये रस्त्याच्या सबग्रेडसाठी वापरण्यात येणारे साहित्य निकृष्ट दर्जाचे आहे. ड्रेनेजचे लेवल चुकीचे व असमान असून एफ आर एल नुसार पुनर्बांधणी आवश्यक आहे. कामाची गती अत्यंत संत आणि मंद आहे. सुरक्षा उपाययोजना पूर्णपणे अनुपस्थित आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण जास्त आहे. पावसाळ्यापूर्वी जी काही खबरदारी घेणे आवश्यक आहे ती घेतल्याचे दिसून येत नाही.सदर प्रकरणाची माहिती देणारा फलक लावलेला दिसून येत नाही. काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणे आवश्यक होते जे सद्यस्थितीत अशक्य दिसत आहे.सदर रोड बाबत पूनररचना, निकृष्ट दर्जा अपूर्ण पीक्यूसी (झटउ) रस्ता, ीींहिशिलींळेपीशलींळेप ६०० व ळील, मानांकाप्रमाणे तसेच कॉलिटी कंट्रोल प्रमाणे व्हावे या संबंधी विभागीय कार्यालय लातूर येथे कार्यकारी अभियंता यांना निवेदन/तक्रार सादर करून संबंधित रस्ता चांगला दर्जा करावा, संबंधित ठेकेदार संबंधित मुजोर अधिकारी, संबंधित इंजिनियर यांना संबंधित यंत्रणा सूचना द्यावेत. असेही निवेदनात भाजपा नगरसेवक युवा नेते ॲड.गोविंद शिराळे पाटील यांनी म्हटले आहे. यावेळी त्यांच्या समवेत लातूर येथील फौजदारी वकील विजय माने यांची उपस्थिती होती.



# जिगीषा खुल्या एकांकिका स्पर्धेची घोषणा

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी

गेली ३ वर्षे छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित होणाऱ्या 'जिगीषा नाट्यसहवासा'त यावर्षीपासून एका नवीन उपक्रमाची भर पडणार आहे. मराठवाड्यातील रंगकर्मींसाठी 'जिगीषा खुली एकांकिका स्पर्धा' आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धेत महाविद्यालयीन संघ, हौशी नाट्यसंस्था, बँक संघटना असे सर्वच जण सहभागी होऊ शकतात. ही एकांकिका स्पर्धा 'मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन' आणि जिगीषा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून ती फक्त 'मराठवाडा' विभाग पुरतीच मर्यादित आहे.

हि स्पर्धा एकूण तीन प्राथमिक केंद्रांवर आयोजित केली जाणार आहे. यात नांदेड, बीड व छत्रपती संभाजीनगर या केंद्रांचा समावेश आहे. नांदेड केंद्राची स्पर्धा डी. पी. सावंत यांच्या विशेष सहकार्याने व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३० व ३१ जुलै २०२६ रोजी कुसुम सभागृह नांदेड येथे (सहभागी जिल्हे : नांदेड, परभणी, हिंगोली), बीड केंद्राची स्पर्धा डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या विशेष सहकार्याने व नाट्यशास्त्र विभाग के. एस. के. कॉलेज बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ व २ ऑगस्ट २०२६ रोजी के. एस. के. कॉलेज बीड येथे (सहभागी जिल्हे : बीड, लातूर, धाराशीव), छत्रपती संभाजीनगर केंद्राची स्पर्धा एम जी एम विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३ व ४ ऑगस्ट २०२६ रोजी रुक्मिणी सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे (सहभागी जिल्हे : जालना, छत्रपती संभाजीनगर) आयोजित करण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी प्रवेशिका पाठविण्याची अंतिम तारीख दि. १० जुलै २०२६ आहे. या स्पर्धेची अंतिम फेरी शुक्रवार दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी रुक्मिणी सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे होईल. महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी संध्या. उद्घाटन समारंभात स्पर्धेच्या अंतिम फेरीचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न होईल. या स्पर्धेतील अंतिम फेरीतील विजेत्या संघांना सर्वोत्कृष्ट एकांकिका (प्रथम) रु.५१,०००/, सर्वोत्कृष्ट एकांकिका (द्वितीय) - रु. ३१,०००/-, सर्वोत्कृष्ट एकांकिका (तृतीय) - रु. २१,०००/- अशी रोख पारितोषिके देण्यात येतील. याशिवाय सर्वोत्कृष्ट लेखन, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत अशी रोख पारितोषिके आणि प्रशस्तीपत्रक देण्यात येतील.स्पर्धेच्या संदर्भात अधिक माहितीसाठी अभय जोशी (९९३०९६७७११), श्रीपाद पद्माकर (९९२०८८५७३०) व किशोर नरवडे (९८९०५४००८८) यांच्याशी संपर्क साधावा. एकांकिका स्पर्धेचा प्रवेश अर्ज आणि नियमावली ह्ीीिः//ळळीं.श्रू/ गळसळीहरएज्ञरपज्ञळज्ञर या लिंकवर उपलब्ध आहे. या स्पर्धेत नाट्य संघांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महोत्सवाचे आयोजक चंद्रकांत कुलकर्णी, प्रशांत दळवी, दासू वैद्य, नीलेश राऊत, नांदेड केंद्राचे संयोजक बापू दासरी, शिवाजी गावंडे, बीड केंद्राचे संयोजक संजय पाटील देवळाणकर, प्रतिमा जोशी, डॉ. आनंद निकाळजे, डॉ. रेखा शेळके,

# कल्याण मुंडेने ऊसतोड मजूर पुरवठ्याच्या नावाखाली १३.४८ लाखांची फसवणूक केली..!

केज (प्रतिनिधी)

ऊसतोड मजूर पुरवठा करण्याच्या बहाण्याने ट्रॅक्टर मालकाची तब्बल १३ लाख ४८ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी कल्याण बापूराव मुंडे (रा.ताडसोन्ना, ता.बीड) याच्या विरोधात युसूफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

होळ (ता.केज) येथील भीमराव उत्तमराव घुगे हे ट्रॅक्टर वाहतूक व्यवसाय करतात. सन २०२४-२०२५ च्या ऊसतोड हंगामासाठी त्यांनी कर्नाटकातील बालाजी शुगर फॅक्टरी येथे ऊस वाहतुकीचा करार केला होता. त्यासाठी ऊसतोड मजूर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ताडसोन्ना (ता.बीड) येथील कल्याण बापूराव मुंडे याच्याशी १५ मे २०२४ रोजी बैठक झाली. या बैठकीत १६ कोयते (३२ ऊसतोड मजूर) पुरविण्यासाठी १६ लाख रुपयांचा व्यवहार ठरला होता. त्यानुसार घुगे यांनी सुरुवातीला दीड लाख रुपये रोख दिले. त्यानंतर विविध टप्प्यांत ऑनलाइन व रोख स्वरूपात एकूण १५ लाख रुपये मुंडे याला अदा केले. मात्र, करारानुसार १६ कोयत्यांऐवजी केवळ ६ कोयते (१२ मजूर) पुरविण्यात आले. हे मजूरही काही दिवसांत काम सोडून निघून गेले. उर्वरित मजूर पुरविण्याबाबत वारंवार विचारणा करूनही आरोपीने टाळाटाळ केली. अखेर जानेवारी २०२५ मध्ये पैसे परत देण्याचे आश्वासन देऊनही त्याने रक्कम परत केली नाही किंवा मजूरही उपलब्ध करून दिले नाहीत. या व्यवहारात पुरविण्यात आलेल्या मजुरांकडून सुमारे १ लाख ५२ हजार रुपयांचे काम झाले असून, उर्वरित १३ लाख ४८ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी भीमराव घुगे यांच्या फिर्यादीवरून कल्याण बापूराव मुंडे याच्याविरुद्ध आर्थिक फसवणूक केल्याचा गुन्हा युसूफवडगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास पो.हे.कॉ.अमजद सय्यद हे करीत आहेत.

# एसटी महामंडळाच्या लातूर विभागात 'प्रवासी राजा दिन' आणि'कामगार पालक दिन' उपक्रमाचे वेळापत्रक जाहीर

लातूर (जिमाका)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारी आणि सूचनांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण व्हावे, या उद्देशाने एसटी महामंडळाने प्रत्येक आगारात 'प्रवासी राजा दिन' आणि 'कामगार पालक दिन' आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, या अनुषंगाने लातूर विभागातील आगारांसाठी या उपक्रमाचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

या वेळापत्रकानुसार लातूर विभागातील या उपक्रमाची सुरुवात १७ जून २०२६ रोजी औसा आगारातून होणार असून, त्यानंतर २४ जून रोजी उदगीर, १ जुलै रोजी निलंगा, ८ जुलै रोजी अहमदपूर आणि २२ जुलै २०२६ रोजी लातूर आगार येथे या विशेष मोहिमेचे आयोजन केले जाणार आहे.

# कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा यशस्वी सामाजिक सर्व्हेक्षण उपक्रम



माजलगाव । प्रतिनिधी

कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, मोहखेड यांच्या वतीने माजलगाव शहरातील वार्ड क्रमांक १ ते १३ मध्ये ३० मे २०२६ ते १६ जून २०२६ या कालावधीत आर्थिक दुर्बल घटकांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि व्यापक सर्वेक्षण उपक्रम राबविण्यात आला. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाच्या योजना पोहोचवण्याच्या उद्देशाने या उपक्रमाची आखणी करण्यात आली होती.

या सर्वेक्षणामध्ये प्रामुख्याने मुलांचे शिक्षण, कुटुंबाचे आरोग्य, महिला सक्षमीकरण, अपंग व दिव्यांग व्यक्तींच्या समस्या व गरजा, तसेच तरुण वर्गाच्या रोजगारविषयक परिस्थितीची सविस्तर माहिती संकलित करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षा सौ.ऐश्वर्या जयसिंग सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.



बीड ऐन हंगामात पाऊस रुसला, बीड तालुक्यातील पाली येथील बिंदुसरा धरणाची पाणी पातळी कमी झाली आहे (छाया कृष्णा शिंदे)

# आता गाड्या १०० टक्के इथेनॉलवर धावणार; केंद्र सरकारची मंजुरी

नागपूर : केंद्र सरकारने देशात १०० टक्के शुद्ध इथेनॉलचा इंधन म्हणून वापर करण्यास मंजुरी दिली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री यांनी शनिवारी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

यावेळी बोलताना गडकरी यांनी सांगितले की, या निर्णयासंदर्भातील नियम व अटी अंतिम करण्यात आल्या असून त्यासंबंधित फाईलवर त्यांनी स्वाक्षरी केली आहे. देशाचे खनिज तेलावरील आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि वाहतूक क्षेत्रातून होणारे प्रदूषण रोखणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गडकरी यांच्या मते, देशातील वाहन उद्योगाने या बदलाचे स्वागत केले असून अनेक आघाडीच्या वाहन उत्पादक कंपन्या १०० टक्के इथेनॉलवर चालणारी वाहने बाजारात आणण्यासाठी सज्ज आहेत. टोयोटा, सुझुकी, एमजी आणि ह्युंदाईसह अनेक कंपन्या येत्या सहा आठवड्यांत भारतीय बाजारपेठेत नवीन इथेनॉल-आधारित मॉडेल्स सादर करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.भारत सध्या मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची आयात करतो. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा आर्थिक भार पडतो. अशा परिस्थितीत इथेनॉलचा वापर वाढल्यास पेट्रोलवरील खर्च कमी होण्यास मदत होईल तसेच देशाच्या इंधन आयात खर्चातही मोठी बचत होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

इथेनॉल हे एक प्रकारचे अल्कोहोल असून ते साखर, स्टार्चयुक्त पदार्थ आणि कृषी उत्पादनांच्या किण्वन प्रक्रियेतून तयार केले जाते. ऊसाचा रस, मका, बटाटा, कसावा तसेच इतर स्टार्चयुक्त पिकांपासून इथेनॉलची निर्मिती केली जाऊ शकते. पर्यावरणपूरक इंधन म्हणून इथेनॉलचा वापर वाढल्यास कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत होणार असून शेतकरी आणि कृषी क्षेत्रालाही त्याचा लाभ मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




# लाडकी बहीण योजनेचा नवा हप्ता बँक खात्यात जमा

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना मे महिन्याच्या हप्त्याची प्रतीक्षा होती. ही प्रतीक्षा अखेर संपली आहे. कारण, १५ जूनच्या सायंकाळपासून पात्र महिलांच्या खात्यात थेट हस्तांतरण प्रक्रियेद्वारे लाडकी बहीण योजनेचा सन्मान निधी प्राप्त होण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या महिन्यात सरकारने मार्च आणि एप्रिल महिन्याचे एकत्रित पैसे जमा केले होते. तर या महिन्यात सरकारने मे महिन्याचा निधी जमा केला आहे.

सरकारने दिलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार एप्रिलअखेर राज्यात एक कोटी ७७ लाख महिला पात्र लाभार्थी म्हणून निश्चित झाल्या आहेत. सुरुवातीला या योजनेसाठी तब्बल अडीच कोटी अर्ज प्राप्त झाले होते. गेल्या दीड वर्षापासून या अर्जांची विविध टप्प्यांमध्ये छाननी आणि पडताळणी सुरू होती. अर्जदारांचे उत्पन्न, कुटुंबातील सदस्यांची माहिती, शासकीय योजनांचा लाभ, आधार कार्ड, बँक खाते, रहिवासी पुरावे आणि इतर निकषांची सखोल तपासणी करण्यात आली.

# शालेय प्रवेशोत्सवासाठी प्रशासन सज्ज; जिल्ह्यातील १०० शाळांना अधिकाऱ्यांच्या भेटी

**बीड, प्रतिनिधी : नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त १५ जूनपासून जिल्ह्यातील शाळांमध्ये पुन्हा एकदा घंटानाद होणार असून शालेय प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी शिक्षण विभागाने व्यापक नियोजन केले आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हा परिषद व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रवेशोत्सव तसेच जिल्ह्यातील १०० शाळांच्या भेटी यशस्वी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.**

प्रवेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच विविध विभागांतील अधिकारी जिल्ह्यातील १०० शाळांना भेट देऊन शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेणार आहेत. यामध्ये 'निपुण महाराष्ट्र अभियान' अंतर्गत सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती घेण्यात येणार असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे परीक्षणही करण्यात येईल.अधिकारी शाळांमधील भौतिक सुविधा, स्वच्छता, विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वच्छता, क्रीडा साहित्य व क्रीडा सुविधा यांची पाहणी करून आवश्यक सूचना देणार आहेत. शाळांमधील शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे.



दरम्यान, 'आपल्या पाल्याचा जिल्हा परिषद शाळेत प्रवेश करा' या अभियानांतर्गत पालकांमध्ये जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा परिषद शाळांमधील शिष्यवृत्ती योजना, मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके व इतर शैक्षणिक सुविधा यांची माहिती पालकांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.ग्रामपंचायतीचे सरपंच, लोकप्रतिनिधी, शाळा व्यवस्थापन समित्या तसेच ग्रामस्थांनी स्थानिक शासकीय शाळांमध्ये इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत आणि शंभर टक्के विद्यार्थी नोंदणीचे उद्दिष्ट साध्य करावे,

# डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय मिळणार नाही कफ सिरप

नवी दिल्ली : आता सर्दी-खोकला झाला म्हणून औषधांच्या दुकानात जाऊन थेट 'कफ सिरप' विकत घेता येणार नाही. केंद्र सरकारने कफ सिरपच्या विक्रीबाबत अत्यंत कडक पाऊल उचलले आहे. यापुढे डॉक्टरांच्या लेखी चिठ्ठीशिवाय कोणत्याही औषध दुकानात कफ सिरप मिळणार नाही. मध्य प्रदेशात दूषित कफ सिरपमुळे २२ चिमुरड्यांचा मृत्यू झाल्यानंतर केंद्र सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे.केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने औषध नियमावलीतील 'शेड्यूल के' मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे. या अंतर्गत कफ सिरपला डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विकण्याची असलेली सवलत आता पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. मात्र, खोकल्यासाठी वापरल्या जाणा-या चघळण्याच्या गोळ्या किंवा टॅब्लेट्स पूर्वीप्रमाणेच डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय उपलब्ध राहतील. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सरकारने या संदर्भात मसुदा जारी करून हरकती मागवल्या होत्या, ज्यावर आता अंतिम शिक्कामोर्तब झाले आहे.काही महिन्यांपूर्वी मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली होती. येथील दूषित कफ सिरप पिल्याने तब्बल २२ लहान मुलांचा मृत्यू झाला होता. याच काळात राजस्थानमध्येही कफ सिरपमुळे लहान मुलांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या होत्या, जिथे बालकांना मोठ्यांची औषधे देण्यात आली होती. या गंभीर प्रकारानंतर 'ड्रग्ज कन्सल्टेटिव्ह कमिटीच्या' उच्चस्तरीय बैठकीत कफ सिरपच्या थेट विक्रीवर बंदी घालण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.



## मुलांच्या जीवाचा धोका टळणार

अनेकदा पालक डॉक्टरांना न विचारता मुलांना कफ सिरप देतात. यामध्ये 'डेक्स्ट्रोमेथॉर्फिन' सारखे घटक असतात, जे ४ ते ६ वर्षांखालील मुलांसाठी अत्यंत घातक ठरू शकतात. यामुळे श्वसनाचा त्रास होऊन मुलांचा मृत्यूही होऊ शकतो. आता डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय हे सिरप मिळणार नसल्याने मुलांचे जीव वाचण्यास मदत होईल.

## औषध निर्मितीवरही कडक नजर

कफ सिरप गोड करण्यासाठी वापरल्या जाणा-या 'प्रॉपिलिन ग्लायकोल' या घटकामध्ये अनेकदा 'इथिलिन ग्लायकोल' आणि 'डायथिलिन ग्लायकोल' या विषारी रसायनांची भेसळ होते. ही भेसळ रोखण्यासाठी आता सिरप उत्पादनाचे नियम आणि चाचण्या अधिक कडक केल्या जात आहेत. देशांतर्गत बाजारपेठेत विकल्या जाणा-या औषधांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि लहान मुलांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्र सरकारचे हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

# आहो अमर राऊत तुम्ही काय एस.टी. महामंडळाचे जावाई हाऊत..?

## पूर्ण एक तप होऊन गेले तरी अमर राऊत आंबेजोगाई आगारातच आहेत

अंबाजोगाई / सुनील सिरसाट

गेल्या दहा-बारा वर्षांपेक्षा जास्त काळ होऊन गेला. तरी सुद्धा सध्याचे आंबेजोगाई आगाराचे आगारप्रमुख अमर राऊत यांची बदली नाही. त्यामुळे वाहक-चालक इतर कर्मचाऱ्यांसह संपूर्ण शहर आणि तालुक्यातील नागरिकांना सुद्धा प्रश्न पडला आहे की, पूर्ण एक तप संपत आले आहे. तरीसुद्धा बदली होत नाही म्हणजे अमर राऊत हे काय एस.टी. महामंडळाचे जावाई हाऊत का..?

एका दशकापेक्षा जास्त काळापूर्वी अंबाजोगाईचेच असणारे अमर राऊत टी.आय. म्हणून अंबेजोगाई आगारात आले आणि ते येथेच ए.टी.एस. झाले. पुढे आज ते डी.एम. आर म्हणून येथेच कार्यरत आहेत. एका मर्यादेपेक्षा जास्त कालावधी अंबाजोगाई आगारातच गेल्याने अमर राऊत यांचे कामापेक्षा जास्त राजकीय संबंध वाढले आहेत. शिवाय डेपो मध्ये राजकीय हस्तक्षेप ही वाढला आणि मग अशा वरदहस्तामुळे ते कर्मचाऱ्यांचा फोन उचलत नाहीत. कुणालाही मोजायला तयार नाहीत. मग लालपरी रस्त्यावर धावत असताना वाहक-चालकांना छोटी-छोटी वा मोठी गंभीर समस्या निर्माण झाली तर त्यांनी संपर्क कोणाशी करायचा.? कारण त्यांनी वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केला तरी हे आगार प्रमुख फोन उचलत नाहीत. त्यामुळे अनेक वेळा वाहक-चालकांना मोठ्या गंभीर परिस्थितीला सामोरे जावे लागल्याचे अनेक दाखले आहेत. शिवाय आपल्या मर्जीतील किंवा आपल्या अवतीभोवती फिरणाऱ्या आणि मुजरेगिरी करणाऱ्या चालक-वाहकांनाच मर्जीतील ड्युटी देण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून या आगारात सुरू असल्याच्या अनेक तक्रारी आहेत.

हे तर काहीच नाही याहीपेक्षा महाभयंकर प्रकार म्हणजे अगोदरच तुटपुंज्या पगारात नौकरी करत असल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर असल्याने शिक्षण व इतर बाबी तर फारच दूर राहत असल्याने बिचारे वाहक-चालक जीवाचे रान करून लांब पडल्याच्या ड्युट्या घेतात. परंतु हे आगार प्रमुख महाशय हे अशा वाहकांना त्यांच्या आगाऊ भरलेल्या तासांचा ओहरटाईम सुद्धा देत नाहीत. असे काही प्रकार या आगारात सातत्याने सुरू आहेत.



उदाहरणार्थ सांगावयाचे झाले तर वाहक बॅच क्र. ४४६१ आणि चालक बॅच क्र. १९६४२ हे २२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी सात वाजताची आंबेजोगाई--पुणे वल्लभनगर गाडी नं. ४४०२ घेऊन पुणे गेले आणि त्याच दिवशी परत येऊन २३ तारखेला रात्री साडेनऊ ची मुंबई गणपतीफेर ड्युटी केली. तर या ड्युटी चा साडेआठ तासाचा ओव्हरटाईम दिला गेला नसल्याचे नाव न छापण्याच्या अटीवर वाहका व्यतिरिक्त दुसऱ्याच कर्मचाऱ्याने आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. कारण वाहक-चालक यांना ड्युट्या लावण्यासह इतरही छोटछोट्या गोष्टींमध्ये प्रसंगानुरूप त्रास देऊन ब्लॅकमेल केले जाते. त्यामुळे हतबल असणारे वाहक-चालक उघडपणे येऊन तक्रार देऊ शकत नाहीत. असेही अनेकांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. तर दुसरीकडे टी.टू.ओ. म्हणजे ड्युटी मस्टर भरणारे जाधव आणि त्यांचे सहकारी यांचे रोटेशन लावले जात नाही. यांच्या माध्यमातून वाहक-चालकांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक केली जाते. असा अनागोंदी आणि मनमानी कारभार या आगारात सुरू असून याकडे वरिष्ठांचे कसलेच लक्ष नाही.

जेवढ्या काळापासून अमर राऊत हे आंबेजोगाई डेपोत कार्यरत आहेत. तितक्या वर्षात कितीतरी विभाग नियंत्रक (ऊ), विभागीय कार्यशाळा अधीक्षक (चएज) आणि इतर अन्य अधिकारी बदलून गेले-आले. तरी हे महाशय अमर राऊत जागेवरच आहेत. आणि मग यामुळे इतक्या वर्षापासून राऊत जागेवरच कसे..? हा प्रश्न आता सर्वांनाच पडला आहे. राऊत अशाप्रकारे ठाण मांडून बसल्यामुळेच कधीकाळी सलग दोन-तीन वर्ष उत्पन्नामध्ये आणि स्वच्छतेमध्ये मोठे गुणांकन-मानांकन मिळवत अंबाजोगाई आगार मराठवाड्यात क्रमांक एक तर महाराष्ट्रात पहिल्या पाच मध्ये असायचे. या अशा नावाजलेल्या आगारामध्ये अमर राऊत यांच्या काळात मोठ्या प्रमाणात आफरातफर सुरू असून त्यांनी आपल्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याची चर्चाही आता डेपोत आणि डेपो बाहेर एऐकावयास मिळत आहे. शिवाय आपल्या मनमानी मध्ये आणि राजकीय वरदहस्त आणि वैयक्तिक संबंधांमध्ये गुंतलेले अमर राऊत हे प्रवाशांच्या सोयीसुविधां बाबतीत टोकाचे उदासीन असल्याचे वारंवार दिसून येते आहे. याबाबतीत सांगायचे झाले तर अनेकदा निरनिराळ्या नवीन गाड्या डेपोसाठी मंजूर करून पाठवण्याचा प्रस्ताव आगाराकडे प्रस्तावित करण्यात आला असता थेट नवीन गाड्यांना नामंजुरी देण्याचे काम करत या माहाशयांनी जुन्या गाड्यांना प्राधान्य दिले. कारण जुन्या गाड्यांच्या दुरुस्तीच्या नावाखाली हवा तसा भ्रष्टाचारही करता येतो आणि वाहक-चालकांची पाहिजे तेवढी पिळवणूक करून आपली मनमानी करता येते. म्हणूनच अमर राऊत यांची भूमिका नेहमी संशयास्पद राहिलेली आहे. एकाच जागेवर इतक्या वर्षापासून एक अधिकारी थांबल्यावर कोणतेही शासकीय कार्यालय असो कारभार हा ढसाळच असतो. याचे कितीतरी दाखले आपण पाहिले आहेत आणि पाहत आहोत. तेंव्हा या एवढ्या साऱ्या तक्रारी असताना आणि थेट राऊतांचा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आलेला असताना सुद्धा नेमका अमर राऊत यांच्या डोक्यावर कुणाचा वरदहस्त आहे. जेणेकरून पालीसारखे घट्ट चिटकून बसलेले हे अमर राऊत आंबेजोगाई आगार सोडायला तयारच नाहीत. किंवा वरिष्ठ प्रशासन त्यांची बदली करायला तयार नाही. मग यावरून आंबेजोगाईचे आगार प्रमुख अमर राऊत हे एस.टी. महामंडळाचे जावई आहेत का..? अशीच चर्चा आता सध्या जोर धरू लागलेली आहे. तेंव्हा त्यांच्या एकंदरीत कारभाराच्या बातम्या विविध वर्तमानपत्रातून आणि चॅनलमधून मोठ्या प्रमाणात प्रसारित होऊन सुद्धा एस.टी. महामंडळ त्यांची बदली करत नाही.यावरून नेमके काय गौडबंगाल आहे हे कळायला मार्ग नाही. परंतु आता तरी महामंडळास जाग येईल का..? आणि अनेकदा झालेली बदली रद्द करून अमर राऊत यांना अंबाजोगाई येथेच कायम केलेल्या आगार प्रमुख महाशयांची आता तरी बदली होईल का..? याकडे जाता एस.टी. कर्मचाऱ्यांसह संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे.

## प्राण गेला तरी बेहत्तर, पण शत्रूपुढे झुकणार नाही..!

मेवाडचे राजा क्रांतीसुर्य महाराणा प्रतापसिंह सिसोदिया म्हणजे वीरता,त्याग,धैर्य, बलिदान,चारित्र्य शिकता,राष्ट्रभक्ती व देशाभिमान याचं मूर्तिवंत प्रतिक होय.अशा महापराक्रमी अन् अपराजित राजाचा जन्म बाप्पा रावल यांच्या राजवंशात १७ जून १५४०(तिथीप्रमाणे)रोजी कुंभलगड येथे झाला अन् जणू हिंदुत्वाचा रक्षणकर्ता क्रांतीसुर्यच भारतभूमीवर उदयास आला. महाराणा प्रताप यांच्या पिताश्रींचे नाव उदयसिंह तर, मातोश्रींचे महाराणी जयवंता कुंवर.



क्रांतीसुर्य महाराणा प्रतापसिंह यांनी बाप्पा रावल,राणा खुमानसिंह, समरसिंह,राणासंग, राणाकुंभ, उदयसिंह यांच्या शौर्याचा वारसा अखेरच्या श्वासापर्यंत जपला. म्हणूनच ते क्रांतीसुर्य म्हणवले गेले.राणा प्रताप यांचा राज्याभिषेक गोगुंदा येथे संपन्न झाला.मेवाडच्या राजांचे आराध्य दैवत एकलिंग महादेव हे होते. पारतंत्र्याच्या साखरभाता पेक्षा मला माझ्या स्वातंत्र्यातली मिठभाकर, कंदमुळे पसंद आहेत,असे महाराणा प्रताप हे प्रजेला सांगत असतं.म्हणूनच तर ते ठणकावून सांगत असत की,

प्राण गेला तरी बेहत्तर,पण शत्रूपुढे झुकणार नाही.!

महाराणा प्रताप यांच्याकडे अकबर बादशहापेक्षा तुलनेत सैन्यबळ व युद्ध सामग्री अत्यल्प असूनही महाराणा प्रताप हे सन १५७६ ते १५८६ या दशकात मोगल सैन्याशी प्राणपणाने लढले. हळदीघाट अन् खमनौरच्या युद्धात वनवासी धनुष्यधारींच्या सहाय्याने अकबर बादशाह व त्याच्या सैन्याला जेरीस आणून त्यांना रणांगणावरून सळो की पळो करून सोडले.

युद्धाच्या वेळी शूरवीर महाराणा प्रताप त्यांच्या अंगावर चिलखत तसेच भाला,तलवार(दोन) व अन्य युद्धाचे साहित्य या सर्वांचे वजन २०८ किलो असायचे.त्यांची उंची साडे सात फूट होती.यावरून त्यांच्या शारीरिक बळाचा अंदाज येतो.राणा प्रतापांचे असे अवाढव्य रूप पाहिल्याने अकबर बादशहांनी आपल्या आख्या जीवनात कधीही राणा प्रतापांसमोर युद्ध करण्याचे धाडस दाखविलं नाही,हे ऐतिहासिक वास्तव आहे.यावरून हे सिद्ध होतं की,अकबर बादशहाच्या मनात राणा प्रतापांबद्दल केवढं मोठं भय होतं.

या पार्श्वभूमीवरच त्यांना अपराजित राजा म्हटलं जातं.

बारा वर्षे चाललेल्या हळदीघाटाच्या युद्धात अकबर बादशाह अन् त्यांच्या मोगल सैनिकांना जेरीस आणले. त्यामुळे त्यांनी माघार घेऊन अखेर ते आपल्या राज्यात परतले.संकटसमयी वनवासींनी राणा प्रताप व त्यांच्या सैन्यदलाला मदतीचा हात दिल्याची इतिहासात नोंद झाली.यासाठीच मेवाडच्या राजचिन्हावर एका बाजूस राजपूत सैनिक तर दुसऱ्या बाजूला वनवासी सैनिकाची प्रतिमा कोरली आहे.या राजचिन्हावरून दोन्ही समाजामधील बंधुत्वाचं नातं प्रतिबिंबित होतं.अत: क्रांतीसूर्य महाराणा प्रताप,निष्ठावान चेतक अन् पराक्रमी वनवासी सेना यांना राजपूत समाजातर्फे त्रिवार मानाचा मुजरा!

हळदीघाट व अन्य युद्धात संपादन केलेल्या विजयात राणा प्रताप यांच्या चेतक अश्वाचा मोलाचा वाटा राहिला.रणांगणावर संकटसमयी स्वतःचा जीव धोक्यात टाकून आपल्या धन्याचे प्राण वाचविणाऱ्या चेतकीची स्वामीनिष्ठा ही अतुलनीय व अवर्णनीय आहे.म्हणूनच राणा प्रताप हे चेतकला आपल्या गळ्याचं ताईत मानत.स्वतः जखमी अवस्थेत असूनही धन्याचे प्राण वाचविण्यासाठी चेतकने ६० फूट लांबीच्या नाल्यावरून छलांग मारली.वास्तवात चेतकचं हे धैर्याचं प्रतिक आहे.कृतज्ञतेच्या भावनेतून राणा प्रताप यांनी चेतकचे जारोळ येथे स्मृती स्मारक उभारले.चेतकीची धन्याबद्दलची अपार निष्ठा,निस्सिम भक्ती अन् असामान्य पराक्रमाची नोंद भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरात कोरली गेली.

विशेष लेख :

१७ जून - महाराणा प्रताप जयंती

शब्दांकन...

**रणवीरसिंह राजपूत ठाणे/नंदुरबार**

निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी,

माहिती व जनसंपर्क,महाराष्ट्र शासन

## स्थानिक गुन्हे शाखेने अंबाजोगाईत मोटार सायकल चोरी करणारा आरोपी ६ दुचाकी वाहनासह केला अटक

बीड /प्रतिनिधी

दिनांक १५ जून २०२६ रोजी स्थागुशा पथकाला माहीती मिळाली की, अंबाजोगाई येथे संतोष बाबासाहेब मुंडे रा वरवटी ता. अंबाजोगाई याने बीडसह शेजारील जिल्हयातुन बऱ्याच दुचाकी चोरल्या असुन त्याचे राहते घराचे पाठीमागे लपवून ठेवल्या आहेत.अशी खात्रीशीर बातमी मिळाली. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सदर ठिकाणी जावून संतोष मुंडेला ताब्यात घेतले. त्यास मोटर सायकल चोरी संदभनि विचारपूस केली असता त्याने विविध ठिकाणाहून चोरलेल्या दुचाकी घराचे पाठीमागे झाकून ठेवलेल्या दाखवल्या. त्यामध्ये अंबाजोगाई शहरातून दोन, पुण्यामधुन एक, लातुर मधुन एक तर परभणी मधून एक अशी एकूण सहा दुचाकी चोरल्याचे कबुल केले. आम्ही मिळुन आलेल्या दुचाकीचा पोलीस अभिलेख पडताळणी केली असता खालील मोटार सायकलचे चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.



पोलीस अधीक्षक बीड, यांनी बीड जिल्हयामध्ये घडणाऱ्या दुचाकी चोरीच्या अनुषंगाने मोटार सायकल चोरी करणाऱ्या आरोपीस पकडुन गुन्हे उघडकीस आणण्याचे सुचना दिल्या होत्या, त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे स्वतंत्र पथक दुचाकी चोरी करणाऱ्या ईसमांचे मागावर होते. पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं १३२/२०२६ कलम ३०३(२) बी.एन.एस अन्वये दुचाकी चोरीचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करीत होते. तांत्रीक विश्लेषण व सिसिटिव्हीच्या आधारे दुचाकी चोरी करणाऱ्या ईसमांची गोपनिय बातमीदारामार्फत संशयीत ईसमांचे नांवाची माहीती मिळाली होती परंतु आरोपी मिळुन येत नव्हता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीवरून सदरील आरोपीस एक नव्हे तर तब्बल सहा चोरलेल्या दुचाकी वाहनासह ताब्यात घेतले आहे. या धाडसी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. याप्रकरणी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं १३२/२०२६ कलम ३०३ (२) बी.एन.एस आणि पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं ३२४/२०२५ कलम ३०३ (२) बी.एन.एस व पोलीस ठाणे गंगाखेड जि. परभणी गु.र.नं २९/२०२६ कलम ३०३ (२) बी.एन.एस ईतर तीन मोटार सायकलचा अभिलेख मिळुन आला नाही. त्या बाबत अधिक तपास पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर हे करीत आहेत.

तरी आरोपीचे ताब्यातून एकुण २,२०,०००/- मुद्देमाल जप्त करुन आरोपी व मुद्देमाल पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरील कामगिरी श्रीमती चेतना तिडके, प्रभारी पोलीस अधीक्षक, बीड, ऋषिकेश शिंदे, पोलीस उपअधीक्षक, अंबाजोगाई, शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णु सानप, गोविंद भताने, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, विकी सुरवसे व चालक अतुल हराळे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

## ब्युटीपार्लर व्यवस्थापन प्रशिक्षण संपन्न

### प्रशिक्षणामुळे मिळाली महिलांना स्वयंरोजगाराची संधी




धुळे (जिमाका वृत्तसेवा)

सेंट्रल बँक ऑफ इंडिया संचालित सेन्ट ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (ठडएढख), नगाव, धुळे येथे आयोजित ३५ दिवसीय ब्युटीपार्लर व्यवस्थापन प्रशिक्षण यशस्वीरित्या संपन्न झाले. या प्रशिक्षणामुळे महिलांना व मुलींना स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

समारोप कार्यक्रमात संस्थेचे संचालक प्रदीप कुमार यांनी महिलांनी कौशल्याच्या बळावर स्वावलंबी बनावे, असे आवाहन केले. प्रशिक्षणादरम्यान दिपक पाटील, योगिता भदाणे, दर्शना जोशी आणि मनोज पगारे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. प्रशिक्षक कविता सावंत यांनी प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले, तर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सीआरपी मनीषा बागुल यांनी विशेष सहकार्य केले.




## जिल्हा कारागृह, अलिबाग येथे विधी साक्षरता कार्यक्रम संपन्न

रायगड-अलिबाग (जिमाका)

प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग श्रीनिवास अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा कारागृह, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कारागृहात विशेष विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी जिल्हा कारागृह अधीक्षक बांदल यांच्यासह कारागृहाचे इतर अधिकारी, कर्मचारी आणि बंदी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## जि.प. प्राथमिक शाळा औरंगपूर कुकडा (दगडगाव) येथे 'प्रवेशोत्सव' उत्साहात संपन्न

बालकांच्या वेशभूषेने आणि कर्तव्यदक्ष शिक्षिकेने वेधले लक्ष..!

बीड /प्रतिनिधी

येथील जि.प. प्राथमिक शाळा औरंगपूर कुकडा येथे नवीन शैक्षणिक वर्षाचे स्वागत अत्यंत उत्साही आणि नाविन्यपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावर्षीच्या 'प्रवेशोत्सव' कार्यक्रमात पहिलीच्या विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे, वेगवेगळ्या क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या वेशभूषेत असलेले विध्यार्थी आणि त्यांना घडवण्याचे ध्येय बाळगणाऱ्या शिक्षिका.

शाळेतील शिक्षिका श्रीम. नाईकनवरे विजयमाला बळीराम यांच्या विचारातून शाळेचे मुख्याध्यापक महादेव कारंडे यांच्या सहकार्याने हा आगळा वेगळा उपक्रम राबवला. पहिलीच्या विद्यार्थ्यांना डॉक्टर, पोलीस, पायलट, आर्मी आणि एअर हॉस्टेस यांसारख्या विविध क्षेत्रांतील अधिकार्यांच्या वेशभूषेत सजवले होते.फक्त सजवलेच नाही तर त्यांच्या हातात मी बनणार डॉक्टर, मी बनणार पायलट, पोलीस, आर्मी, वकील असे ध्येय फलक दिले.. हे हातातील फलक पाहून आई वडिलांचं काळीज आणखीनच मोठं झालं. त्यानंतर, सजवलेल्या बैलगाडीतून या बालकांची वाजत-गाजत संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात आली. त्यांचबरोबर उपस्थित महिलांनी त्यांचे औक्षण केले. हातातील ध्येय फलकाची प्राप्ती व्हावी असा आशीर्वाद देऊन शुभेच्छा दिल्या.

बालकांच्या या आगळ्यावेगळ्या रूपाने आणि उत्साहाने गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. पालकांनी आपल्या पाल्यांना अशा विविध वेशभूषेत पाहून आनंद व्यक्त केला.

शाळेचे मुख्याध्यापक महादेव बाबासाहेब कारंडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून शालेय परिसर उत्साही ठेवण्यासोबतच, पालकांशी संवाद साधून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा हा उपक्रम राबवल्याचे कौतुक उपस्थितांनी केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासाठी त्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वाटप गावचे सरपंच अशोक भागवत गाडे व उपस्थित ग्रामस्थ व पालकांच्या हस्ते करण्यात आले. या संपूर्ण उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष अमोल अभिमान गाडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या नाविन्यपूर्ण प्रवेशोत्सवाचे गावकऱ्यांनी आणि पालकांनी भरभरून कौतुक केले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED- 431122 ( MAHARSHTRA ).

# अखेर प्रशासन झुकले दोन दिवसांच्या कोंडीनंतर परतूर नगरपरिषदेचे कुलूप उघडले!

## गटनेते गणेश नळगे आणि विरोधकांच्या आक्रमक भूमिकेपुढे मुख्याधिकारी हतबल; स्वच्छता कर्मचाऱ्यांना अखेर मिळाले लेखी आश्वासन

परतूर पिराजी गायकवाड :-

गेल्या दोन दिवसांपासून प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणाविरोधात परतूर नगरपरिषदेला ठोकण्यात आलेले कुलूप अखेर आज दुपारी साडेतीन वाजता उघडले! स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी पुकारलेल्या या आंदोलनासमोर अखेर प्रशासनाला गुडघे टेकावे लागले आहेत. नगरपरिषदेचे गटनेते गणेश नळगे यांच्या आक्रमक पुढाकाराने आणि विरोधी पक्षाच्या एकजुटीमुळे प्रशासनाची चांगलीच पळताभुई झाली.मुख्याधिकारी घटनास्थळी यावेच लागतील नगरसेवकांचा पवित्रा

कर्मचाऱ्यांनी यापूर्वी तब्बल ५ ते ६ वेळा निवेदने देऊनही प्रशासनाने केवळ पोकळ आश्वासने दिली होती. त्यामुळे संतप्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पाठीशी विरोधी पक्ष खंबीरपणे उभा राहिला. विरोधी पक्षाचे नगरसेवक बाबुराव मामा हिवाळे, शाकीरबाई खतीफ, आबा कदम, वसीम भाई, राजूशेठ खांडेलवाल, मंगेश डहाळे, संतोष पवार यांनी मुख्याधिकाऱ्यांना घटनास्थळी येण्यास भाग पाडत




प्रशासनाला धारेवर धरले. जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचला आवाज; प्रशासनाची धावपळ!

आंदोलनाची कोंडी फुटत नसल्याचे पाहून गटनेते गणेश नळगे व सर्व नगरसेवकांनी थेट उपविभागीय अधिकारी एसडीओ गायकवाड यांच्याशी संपर्क साधून हा गंभीर विषय जिल्हाधिकाऱ्यांच्या दारी नेला. जिल्हा प्रशासनाकडून चक्र फिरताच स्थानिक अधिकाऱ्यांची धावपळ उडाली आणि संबंधित अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.आचारसंहिता संपताच स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सर्व प्रलंबित मागण्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल तसेच नगरपरिषदेकडील थकबाकी निश्चित कालावधीत अदा केली जाईल असे स्पष्ट लेखी आश्वासन प्रशासनाला द्यावे लागले. या लेखी पत्रानंतरच कर्मचाऱ्यांनी आंदोलन मागे घेतले आणि पालिकेचे कामकाज पूर्ववत सुरू झाले.

जनतेने निवडून दिलेले नगराध्यक्ष पळपुटे गणेश नळगेंचा घणाघात!

या यशस्वी आंदोलनानंतर बोलताना नगरपरिषदेचे गटनेते गणेश नळगे यांनी सत्ताधारी पक्षाचा बुरखा टराटरा फाडला. ते म्हणाले

पावसाळा तोंडावर आलेला असताना शहराची धुरा वाहणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. ५-६ वेळा निवेदने देऊनही सत्ताधाऱ्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. सर्वात संतापजनक गोष्ट म्हणजे ज्यांना जनतेने विश्वासाने निवडून दिले ते नगराध्यक्ष स्वतः मात्र पळपुटे ठरले! ते स्वतः घटनास्थळी न येता आपल्या 'डमी' प्रतिनिधींना पाठवत होते. सत्ताधाऱ्यांच्या या संतापजनक कारभारामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे.तर यापेक्षा तीव्र उद्रेक होईल नळगेंचा इशारा

प्रशासनाने आता केवळ कागदी घोडे नाचवू नयेत. दिलेल्या लेखी आश्वासनांची वेळेत पूर्तता झाली नाही, तर स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या न्यायासाठी यापेक्षाही तीव्र आणि आक्रमक आंदोलन छेडले जाईलअसा थेट इशारा गटनेते गणेश नळगे यांनी प्रशासनाला दिला आहे.

आता तरी प्रशासनाला जाग येणार का आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात त्यांच्या हक्काची थकबाकी जमा होणार का ? याकडे संपूर्ण परतूर शहराचे लक्ष लागले आहे.



# साई मॉडर्न इंग्लिश स्कूल येथे पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते भव्य वृक्षारोपण संपन्न!

बदनापूर : (प्रतिनिधी- संजय भुजाळ)पर्यावरण संवर्धन आणि जनजागृतीचा संदेश देत आज, येथील साई मॉडर्न इंग्लिश स्कूल कॅम्पसमध्ये भव्य वृक्षारोपण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन विकास मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे आणि बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. नारायणराव कुचे यांच्या शुभहस्ते विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी सर्वांनी वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. वाढत्या प्रदूषणावर मात करण्यासाठी आणि येणाऱ्या पिढीला शुद्ध हवा व हिरवेगार पर्यावरण देण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगवले पाहिजे, असा संदेश पांकाजाताईंनी या कार्यक्रमातून दिला.या सोहळ्याला परिसरातील राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळींनी उपस्थिती लावली होती. यामध्ये प्रामुख्याने: श्री. सतीश नागरे, श्री. प्रवीण घुगे, श्री. अनिल कोलते, श्री. भगवान म्हात्रे, श्री. बद्रीभाऊ पठाडे, श्री. गजानन गिते, सौ. सुनिता गिते, श्री. बळीराम गिते या सर्व प्रमुख मान्यवरांसह साई मॉडर्न इंग्लिश स्कूलचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते लावलेल्या या रोपट्यांचे उत्तम संगोपन करण्याची ग्वाही शाळा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

# महाराष्ट्रातील ऑलिव्ह रिडले समुद्र कासव संवर्धन कार्यक्रमाला यशस्वी प्रतिसाद

रायगड-अलिबाग (जिमाका) : शासनाच्या वन विभागांतर्गत कांदळवन कक्ष, कांदळवन प्रतिष्ठान आणि स्थानिक कासव मित्र यांच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात येणाऱ्या ऑलिव्ह रिडले समुद्र कासव संवर्धन कार्यक्रमांतर्गत २०२५-२६ हंगामात राज्यातील ५६ समुद्रकिनाऱ्यांवर एकूण १ हजार ७२४ कासवांच्या घरट्यांची नोंद करण्यात आली. या घरट्यांमधील तब्बल १ लाख ०८ हजार ५९६ कासवांच्या पिल्लांना यशस्वीरित्या समुद्रात सोडण्यात आले असून, एकूण उबवण यशाचे प्रमाण ६१.२० टक्के नोंदविण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांपैकी रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक ९६४ घरटी नोंदविण्यात आली असून, त्यामधून ५४ हजार २२७ पिल्लांना समुद्रात सोडण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७३८ घरट्यांमधून ५३ हजार ३२५ पिल्लांना समुद्रात सोडण्यात आले असून, ६९.९५ टक्के इतके राज्यातील सर्वाधिक उबवण यशाचे प्रमाण नोंदविण्यात आले. रायगड जिल्ह्यात २२ घरट्यांमधून १ हजार ४४ पिल्लांना समुद्रात सोडण्यात आले.

# परतूर-मंठा तालुक्यात तीव्र दुष्काळाची झळ हाताला काम नसल्याने शेतमजुरांवर उपासमारीची वेळ

## लाल बावटा शेतमजूर युनियनचा आक्रमक पवित्रा मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा



परतूर पिराजी गायकवाड :-दि. १६ जून २०२६

परतूर आणि मंठा तालुक्यात सध्या तीव्र दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर, शेतकरी आणि कष्टकरी कामगारांवर उपासमारीची भयंकर वेळ आली आहे. शेतीची सर्व कामे पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे मजुरांच्या हाताला कोणतेही काम उरलेले नाही. कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा, असा यक्षप्रश्न आज कष्टकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. या गंभीर पार्श्वभूमीवर, आज महाराष्ट्र राज्य शेतमजूर लाल बावटा युनियनच्या वतीने उपविभागीय अधिकारी एसडीओ परतूर यांना एक जाहीर व धारदार निवेदन देऊन प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करण्यात आला.कागदावर योजना प्रत्यक्षात मात्र शुकशुकाट

शासनाकडे रोजगार हमी योजना रोहयो अस्तित्वात असतानाही प्रत्यक्षात मात्र गावागावांत कामे सुरू नाहीत. प्रशासन नेमके कुणाची वाट पाहत आहे ? असा संतप्त सवाल मजुरांकडून उपस्थित केला जात आहे. दुष्काळात रोजगार, पिण्याचे पाणी, रेशनवर धान्य आणि जनावरांना चारा याचे चोख नियोजन करून रोहयोची कामे तात्काळ सुरू करावीत अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मजुरांच्या या आहेत प्रमुख व न्याय्य मागण्यातात्काळ कामे सुरू करा दुष्काळी परिस्थिती पाहता गावागावांत रोजगार हमीची कामे युद्धपातळीवर सुरू करण्यात यावीत.

जॉब कार्डचे वाटप सर्व पात्र मजुरांना विनाविलंब जॉब कार्ड देण्यात यावे.कामात सातत्य व वेळेत मजुरी: मजुरांना नियमित काम उपलब्ध करून देऊन त्यांची मजुरी थेट आणि वेळेत बँक खात्यात जमा करावी.कामाच्या ठिकाणी मूलभूत सुविधा कडक उन्हाळा लक्षात घेता कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी सावली आणि प्रथमोपचाराची सोय करावी.

नाहीतर तीव्र आंदोलन छेडणार

प्रशासनाने एसी केबिनमधून बाहेर पडून ग्रामीण भागातील मजुरांचे अश्रू पाहावेत. दुष्काळात होरपळणाऱ्या मजुरांना तात्काळ न्याय मिळाला नाही आणि गावागावांत रोहयोची कामे सुरू झाली नाहीत तर लाल बावटा युनियनच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात तीव्र आणि आक्रमक आंदोलन उभारले जाईल ज्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल कॉम्रेड सरिता शर्मा जिल्हाध्यक्ष, जालनाया निवेदनावर प्रतिनिधी पिराजी गायकवाड, मारोती खंदारे, सरिता शर्मा, भगवान कोळे, अशोक साळवे, शेख फरिदा मॅडम यांच्यासह अनेक आक्रमक कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता या निवेदनावर प्रशासन तातडीने आणि सकारात्मक निर्णय घेणार की मजुरांना रस्त्यावर उतरावे लागणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# घनसावंगी गोदाम घोटाळा चौकशी अहवालाला १५ दिवस उलटले तरी दोषींवर कारवाई शून्य

## पुरवठा विभागाचा संशयास्पद विलंब दोषींना वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा

जालना शेख फारुक :-

घनसावंगी येथील बहुचर्चित गोदाम घोटाळ्याच्या चौकशी अहवालाला तब्बल पंधरा दिवसांचा कालावधी उलटून गेला असतानाही संबंधित दोषींवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात पुरवठा विभागाकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात असून दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे.जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे प्रभारी पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत असल्याचे चित्र समोर येत आहे. त्यामुळे महत्त्वाच्या आणि जनहिताच्या प्रकरणांमध्ये अनावश्यक दिरंगाई होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, घनसावंगी गोदाम घोटाळ्याचा चौकशी अहवाल प्राप्त होऊनही त्यावर कोणतीही निर्णायक कार्यवाही न झाल्याने संशय अधिकच गडद झाला आहे.

स्थानिक स्तरावर या प्रकरणाची चर्चा जोर धरत असून, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाचवण्यासाठीच कारवाई लांबणीवर टाकली जात असल्याचा आरोप होत आहे. पुरवठा विभागातील संथ आणि संदेहास्पद कार्यपद्धतीमुळे सामान्य नागरिकांसह स्वस्त धान्य दुकानदारांमध्येही तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, या गंभीर प्रकरणाची जिल्हाधिकारी असिमा मित्तल यांनी स्वतः दखल घेऊन चौकशी अहवालाच्या आधारे तात्काळ आणि निष्पक्ष कारवाई करावी, अशी जोरदार मागणी पुढे येत आहे. घोटाळ्यात दोषी आढळणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करून जनतेचा प्रशासनावरील विश्वास कायम राखण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

अहवाल आला, मग कारवाई का नाही ?

घनसावंगी गोदाम घोटाळ्यातील चौकशी पूर्ण होऊन अहवाल प्रशासनाच्या टेबलावर पोहोचला आहे. मात्र कारवाईचा निर्णय अजूनही रखडलेला असल्याने प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. आता जिल्हाधिकारी स्वतः पुढाकार घेऊन या प्रकरणाचा छडा लावतात का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.दोषींवर कारवाई की घोटाळ्यावर पांघरूण ? याचे उत्तर प्रशासनाला द्यावेच लागणार!

### विधान परिषद निवडणुकीनिमित्त

# लातूर जिल्ह्यात चार दिवस मद्यविक्री बंद

लातूर (जिमाका): उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यात चार दिवस मद्यविक्री बंद राहील. निवडणूक खुल्या, मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी मद्य विक्री बंदीचे आदेश जारी केले आहेत.

मंगळवार, १६ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपासून पुढे मद्य विक्री बंद राहील. तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे बुधवार, १७ जून २०२६ रोजी संपूर्ण दिवस, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी म्हणजेच गुरुवार, १८ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी, सोमवार, २२ जून २०२६ रोजी मतमोजणीच्या ठिकाणी प्रक्रिया पूर्ण संपेपर्यंत मद्य विक्री पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.सर्व संबंधित मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांनी या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. या आदेशाचे पालन करण्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ५४ व ५६ मधील तरतुदीनुसार संबंधितांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २० जून रोजी 'पीएम-किसान उत्सव दिवस 'साजरा होणार

धुळे (जिमाका वृत्तसेवा)

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेचा एप्रिल २०२६ ते जुलै २०२६ या कालावधीतील २३ वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २० जून २०२६ रोजी पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर येथून वितरित करण्यात येणार आहे. या निमित्ताने केंद्र शासनाने २० जून हा दिवस देशभर 'पीएम-किसान उत्सव दिवस'म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

कृषी विभाग, महसूल व वन विभाग तसेच ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभर हा समारोह आयोजित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण हींींिः// ळिपवळरुशललरींं.पळल.ळप/ या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या कार्यक्रमांत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यांनी केले आहे.

# कासार समाजाचा अभिमान; मुखेडचा सुपुत्र डॉ. बिलाल परदेशी यांची प्रेरणादायी यशोगाथा

## जिद्द, मेहनत आणि पालकांच्या संस्कारातून साकारले डॉक्टर होण्याचे स्वप्न

मुखेड प्रतिनिधी

स्वप्न मोठे असेल आणि त्यासाठी प्रामाणिक मेहनत, चिकाटी व सातत्य असेल तर यश निश्चित मिळते, याचा आदर्श मुखेड येथील डॉ. बिलाल हैदर परदेशी यांनी समाजासमोर ठेवला आहे. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनीही योग्य मार्गदर्शन आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर मोठी शिखरे गाठू शकतात, हे त्यांनी आपल्या यशातून सिद्ध केले आहे.

मुखेड नगरपालिकेचे माजी नगरसेवक हैदर अली परदेशी तसेच नोबेल उर्दू माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सायरा बानू परदेशी यांचे चिरंजीव बिलाल परदेशी यांनी नुकतेच वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून एमबीबीएस पदवी संपादन केली आहे. कासार समाजातील नांदेड जिल्ह्यातील डॉक्टर होण्याचा मान मिळविणाऱ्या पहिल्या विद्यार्थ्यांपैकी ते एक ठरले असून त्यांच्या यशामुळे समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

डॉ. बिलाल परदेशी यांनी प्राथमिक शिक्षण मुखेड येथील शाहीर अण्णाभाऊ साठे विद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षण नांदेड येथील केंब्रिज विद्यालयातून घेतले. पुढे त्यांनी विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेज, अहिल्यानगर येथे वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून डॉक्टर होण्याचे आई-वडिलांचे स्वप्न साकार केले.

आई-वडिलांचे संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची मेहनत यांच्या जोरावर मिळविलेले हे यश आजच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. पालकांनी आपल्या मुलांच्या क्षमतेवर विश्वास ठेवून त्यांना योग्य दिशा दिली, तर ग्रामीण भागातील विद्यार्थीही डॉक्टर, अभियंता, अधिकारी अशा विविध क्षेत्रांत यश संपादन करू शकतात.

डॉ. बिलाल परदेशी यांचे यश हे केवळ एका कुटुंबाचे यश नसून संपूर्ण मुखेड शहरासाठी आणि समाजासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या यशातून विद्यार्थ्यांनी ध्येय ठरवा, मेहनत करा आणि अपयशाला न घाबरता पुढे चला हा संदेश घेण्याची गरज आहे.

डॉ. बिलाल परदेशी यांच्या यशाबद्दल माजी आमदार अविनाश घाटे, सेवानिवृत्त अभियंता जिलानी परदेशी यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# जिल्हा परिषद शाळांना बळ देण्याची गरज; शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी समाजानेही पुढाकार घ्यावा

मुखेड प्रतिनिधी (दि.१५) :

मुखेड :- आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे मोठे काम जिल्हा परिषद शाळा सातत्याने करत आहेत. या शाळांमधील शिक्षकांची मेहनत, विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि पालकांचा विश्वास हीच या शाळांची खरी ताकद आहे. मात्र या शाळांना अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनासोबतच समाजातील जबाबदार व्यक्तींनीही पुढे येण्याची गरज आहे.मुखेड शहरातील जिल्हा परिषद शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करणे, शिक्षकांचे कौतुक करणे आणि शाळेच्या गरजा लक्षात घेऊन मदतीचा हात देणे हा उपक्रम निश्चितच स्वागतार्ह आहे. काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व सामाजिक कार्यकर्ते डॉ. श्रावण रॅपनवाड यांनी नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी




शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच जि.प. कन्या शाळेला फॅन भेट देऊन विद्यार्थिनींसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला.शाळा म्हणजे केवळ इमारत नसून ती विद्यार्थ्यांच्या भविष्याची पायाभरणी करणारी संस्था आहे. त्यामुळे शाळांचे संरक्षण, विद्यार्थिनींची सुरक्षितता, मूलभूत सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या बाबींना प्राधान्य देणे ही प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि समाजाची संयुक्त जबाबदारी आहे.

विशेषतः मुलींच्या शिक्षणासाठी सुरक्षित आणि पोषक वातावरण निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. एखादी घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्यापूर्वीच योग्य नियोजन करून खबरदारी घेणे ही काळाची गरज आहे.

सत्ता असो वा नसो, समाजातील प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून सकारात्मक योगदान देणारे प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी ठरतात. जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी अशा सामाजिक सहभागाची गरज आहे. कारण आजच्या शाळांमधूनच उद्याचे जबाबदार नागरिक घडणार आहेत.

# जिजाई मसाले प्रा.लि.च्या सामाजिक उपक्रमातून ग्रामीण शिक्षणाला बळ

## सागर आप्पा धस यांचे जिल्हा परिषद शाळांवर विश्वास ठेवण्याचे आवाहन

बावीत शाळा प्रवेशोत्सवानिमित्त १२० विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य व पोशाख वाटप

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ग्रामीण भागातील शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी आणि जिल्हा परिषद शाळांबद्दल समाजात सकारात्मक विश्वास निर्माण करण्याच्या उद्देशाने आष्टी तालुक्यातील बावी येथे शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रवेशोत्सवानिमित्त जिजाई मसाले प्रा. लि.च्या वतीने इयत्ता पहिली ते पाचवीच्या सर्व १२० विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी संपूर्ण शैक्षणिक साहित्य, शालेय पोशाख तसेच विविध आवश्यक वस्तूंचे मोफत वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाची सुरुवात आनंद, आत्मविश्वास आणि प्रेरणादायी वातावरणात व्हावी या उदात्त हेतूने हा आदर्श उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते सागर आप्पा धस हे उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी जिल्हा परिषद शाळांचे समाजातील महत्त्व अधोरेखित केले. ग्रामीण भागातील गोरगरीब, शेतकरी, कष्टकरी आणि वंचित कुटुंबांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे मोठे कार्य जिल्हा परिषद शाळा करत असल्याचे त्यांनी सांगितले. आज अनेक जिल्हा परिषद शाळा सुविधा, गुणवत्ता आणि शैक्षणिक निकालांच्या बाबतीत खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांशी स्पर्धा करत आहेत. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी जिल्हा परिषद शाळांवर विश्वास ठेवून त्यांना प्रवेश द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.सागर आप्पा धस पुढे म्हणाले की, गावातील शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून ती गावाच्या विकासाची आणि भविष्यातील पिढी घडविण्याची कार्यशाळा आहे. आपल्या गावातील शाळा सक्षम आणि समृद्ध राहिल्या तरच गावाचा शैक्षणिक आणि सामाजिक विकास शक्य होईल. त्यामुळे लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक आणि दानशूर व्यक्तींनी जिल्हा परिषद शाळांच्या विकासासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. शासनाच्या योजनांसोबतच लोकसहभागातूनही शाळांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. शिक्षणासाठी उभा राहणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगत समाज म्हणून ओळखला जातो, असेही त्यांनी नमूद केले.या उपक्रमामागील प्रेरणास्थान बाबू भैय्या गर्जे यांनी आपल्या मनोगतात भावनिक भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, ज्या जिल्हा परिषद शाळेने मला घडविले, शिक्षणाची दिशा दिली आणि



जीवनात यशस्वी होण्यासाठी आधार दिला, त्या शाळेचे ऋण फेडण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे म्हणजे त्यांच्या स्वप्नांना नवे पंख देण्यासारखे आहे. शिक्षण हीच सर्वात मोठी सामाजिक गुंतवणूक असून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणासारखा दुसरा पर्याय नाही, असे त्यांनी सांगितले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना दर्जेदार शालेय दप्तर, वह्या, कंपास पेटी, नियमित शालेय गणवेश, पी.टी. ड्रेस तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्याचे मोफत वितरण करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी सर्व साहित्य हातात मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. अनेक पालकांनी या उपक्रमाचे कौतुक करत जिजाई मसाले प्रा. लि. आणि आयोजकांचे आभार मानले.

कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, केंद्रप्रमुख सौ. सावंत, केंद्रीय मुख्याध्यापक मेहेरकर, बावीचे सरपंच डॉ. नवनाथ गर्जे, ज्येष्ठ पत्रकार अण्णासाहेब साबळे, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पालक, ग्रामस्थ, शिक्षकवृंद तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे सर यांनी केले, तर शाळेचे मुख्याध्यापक अशोक लटपटे यांनी जिजाई मसाले प्रा. लि., मान्यवर आणि उपस्थित सर्वांचे आभार मानले.बावी येथे राबविण्यात आलेला हा उपक्रम केवळ साहित्य वाटपापुरता मर्यादित न राहता ग्रामीण शिक्षणाला बळकटी देणारी सामाजिक चळवळ ठरला आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची संधी पोहोचविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. जिल्हा परिषद शाळा सक्षम झाल्यास गोरगरीब आणि वंचित मुलांचे शिक्षण सुरक्षित राहील, त्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळेल आणि त्यातूनच समाज व राष्ट्राची प्रगती साध्य होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

ग्रामीण भागातील प्रत्येक गावाने आपल्या शाळेच्या विकासासाठी अशाच प्रकारे पुढाकार घेतला, तर जिल्हा परिषद शाळांचे वैभव पुन्हा एकदा उजळून निघेल. शिक्षणाचा दीप अधिक तेजाने प्रज्वलित होईल आणि ज्ञानाची गंगा समाजातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचेल, असा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला.

# दक्षिणेश्वर काली मंदिरातील दर्शन, २५० वर्षे जुन्या महावटवृक्षाचे अवलोकन

## माजी आ.भीमराव धोंडे यांच्यासह मान्यवरांचा आध्यात्मिक व ज्ञानवर्धक दौरा

सर्वधर्मसमभावाचा संदेश देणाऱ्या बेलूर मठाला आष्टीच्या शिष्टमंडळाची सदिच्छा भेट

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) मानवतेचा, आध्यात्मिकतेचा आणि सर्वधर्मसमभावाचा जागतिक संदेश देणाऱ्या कोलकाता येथील प्रसिद्ध रामकृष्ण परमहंस बेलूर मठाला आष्टीचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या शिष्टमंडळाने नुकतीच सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने बेलूर मठाच्या आध्यात्मिक परंपरेचा अनुभव घेतला तसेच दक्षिणेश्वर काली मंदिर आणि जगप्रसिद्ध महावटवृक्षाचे दर्शन घेऊन एक अविस्मरणीय आध्यात्मिक व सांस्कृतिक प्रवास अनुभवला.

या शिष्टमंडळामध्ये आक्रूर कुदळे, दिलीप फरांदे, हरिचंद्र भुजबळ, धनंजय हिवरकर, प्रदीप गारडकर, किशोर फल्ले, रमाकांत मुंडे, बाळासाहेब भुकन, उत्तम बोडखे, संजय शेंडे यांच्यासह आष्टी परिसरातील अनेक मान्यवर आणि माजी आ. धोंडे मित्र मंडळाचे सदस्य सहभागी झाले होते.

हुगळी नदीच्या विस्तीर्ण आणि निसर्गरम्य तीरावर वसलेला बेलूर मठ हा केवळ धार्मिक स्थळ नसून मानवतेच्या एकात्मतेचा संदेश देणारे जागतिक आध्यात्मिक केंद्र म्हणून ओळखला जातो. राष्ट्रसंत स्वामी विवेकानंद यांनी आपल्या गुरू ठाकूर श्री रामकृष्ण परमहंस यांच्या स्मृती जपण्यासाठी आणि त्यांच्या उदात्त विचारांचा प्रसार करण्यासाठी या मठाची स्थापना केली. या मठाच्या वास्तुरचनेत हिंदू मंदिर, बौद्ध स्तूप, इस्लामी मशीद, जैन मंदिर आणि ख्रिश्चन चर्च यांच्या स्थापत्य वैशिष्ट्यांचा सुंदर संगम पाहायला मिळतो. त्यामुळे ही वास्तू स्वामी विवेकानंदांच्या सर्वधर्मसमभाव आणि जागतिक बंधुत्वाच्या विचारांची सजीव अभिव्यक्ती ठरते.

मठाच्या परिसरात प्रवेश करताच जाणवणारी शांतता, स्वच्छता आणि सात्त्विक वातावरणाने शिष्टमंडळातील सदस्य भारावून गेले. सर्वप्रथम त्यांनी श्री रामकृष्ण परमहंस यांच्या मुख्य मंदिरात जाऊन दर्शन घेतले. मंदिरातील ध्यानधारणेत सहभागी होत आध्यात्मिक शांततेचा अनुभव घेतला. त्यानंतर स्वामी विवेकानंद यांचे निवासस्थान, त्यांच्या जीवनकार्याशी संबंधित वस्तू जतन करून ठेवलेले संग्रहालय तसेच माँ शारदा देवी मंदिराला भेट देण्यात आली. या ठिकाणी जपलेल्या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारशाने उपस्थितांना विशेष प्रभावित केले.

बेलूर मठ परिसरातील हिरवागार निसर्ग, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि हुगळी नदीचा विस्तीर्ण किनारा पर्यटकांना वेगळाच आनंद देतो. मठामार्फत चालविण्यात येणारे शैक्षणिक, सामाजिक, आरोग्यविषयक आणि सेवा प्रकल्पांची माहितीही शिष्टमंडळाने घेतली. समाजकल्याणासाठी कार्यरत असलेल्या या उपक्रमांमुळे बेलूर मठाचे कार्य केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नसून मानवसेवेचे व्यापक केंद्र असल्याची जाणीव सर्वांना झाली.

या दौऱ्यादरम्यान शिष्टमंडळाने कोलकाता येथील अत्यंत प्रसिद्ध आणि जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दक्षिणेश्वर काली माता मंदिराला देखील भेट दिली. हे मंदिर श्री रामकृष्ण परमहंस यांच्या साधनेशी आणि अध्यात्मिक कार्याशी निगडित असल्याने त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मंदिरातील भक्तिमय वातावरण, काली मातेसमोरील दर्शन आणि हुगळी नदीच्या घाटावरील नयनरम्य दृश्यांनी भाविक मंत्रमुग्ध झाले. या पवित्र स्थळाने सर्वांच्या मनावर आध्यात्मिकतेची गहिरी छाप उमटवली.

आध्यात्मिक अनुभूतीसोबतच शिष्टमंडळाने निसर्गाचा एक अद्भुत चमत्कारही अनुभवला. कोलकाता येथील आचार्य जगदीशचंद्र बोस भारतीय वनस्पती उद्यानात असलेल्या जगातील सर्वात मोठ्या वडाच्या झाडाला त्यांनी भेट दिली. सुमारे २५० वर्षांपूर्वीचे हे विशाल वृक्ष जवळपास पाच एकर परिसरात विस्तारलेले असून एका संपूर्ण जंगलाचा भास निर्माण करतो. हजारो पारंब्यांनी विस्तारलेल्या या महावटवृक्षाचे दर्शन घेताना निसर्गाच्या अद्वितीय सामर्थ्याची प्रचिती आल्याची भावना शिष्टमंडळातील सदस्यांनी व्यक्त केली.

या संपूर्ण दौऱ्यामुळे अध्यात्म, इतिहास, संस्कृती आणि निसर्ग यांचा संगम अनुभवण्याची संधी मिळाल्याचे सदस्यांनी सांगितले. ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरलेल्या या प्रवासाच्या आठवणी सर्वांच्या मनात कायम राहतील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले, बेलूर मठ ही केवळ एक भव्य वास्तू नसून मानवतेचे, आध्यात्मिक ऊर्जेचे आणि




सर्वधर्मसमभावाचे महापीठ आहे. स्वामी विवेकानंदांच्या कर्मभूमीत येऊन आणि श्री रामकृष्ण परमहंस यांच्या विचारांचे केंद्र प्रत्यक्ष अनुभवून मनाला विलक्षण शांती, सकारात्मक ऊर्जा आणि जीवनाला नवी दिशा देणारी प्रेरणा मिळाली. समाजामध्ये बंधुभाव, सेवा आणि मानवतेची मूल्ये रुजविण्यासाठी अशा पवित्र स्थळांच्या भेटी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या भेटीद्वारे महाराष्ट्रातील शिष्टमंडळाने भारतीय अध्यात्म, संस्कृती आणि मानवतेचा संदेश जगभर पोहोचविणाऱ्या बेलूर मठाच्या कार्याला जवळून जाणून घेतले आणि सर्वधर्मसमभावाच्या विचारांना प्रत्यक्ष अनुभवण्याचा अनमोल योग साधला.

# एल निनोच्या संकटात घाबरू नका;वैज्ञानिक व नियोजनबद्ध शेतीद्वारे आव्हानांवर मात करा

## आ.सुरेश धस यांचे शेतकऱ्यांना आवाहन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) यंदाच्या वर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची, पावसात दीर्घ खंड पडण्याची तसेच उष्णतेची तीव्रता वाढण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांना घाबरून न जाता वैज्ञानिक, तांत्रिक आणि नियोजनबद्ध पद्धतीने खरीप हंगामाचे व्यवस्थापन करण्याचे आवाहन केले आहे. बदलत्या हवामानाच्या परिस्थितीत शेतीसमोर अनेक आव्हाने उभी राहिली असली तरी योग्य नियोजन आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करून त्यावर मात करता येऊ शकते, असा विश्वास आमदार धस यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांनी उपलब्ध जलस्रोतांचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर करण्यावर भर द्यावा, असे सांगताना त्यांनी शेततळी, विहिरी, बंधारे, नाला खोलीकरण तसेच विविध जलसंधारण उपाययोजनांद्वारे पावसाचे पाणी जास्तीत जास्त साठवून ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.



आमदार धस म्हणाले की, एल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांनी कमी कालावधीत येणाऱ्या, दुष्काळ सहनशील आणि कमी पाण्यात तग धरणाऱ्या पिकांच्या वाणांची निवड करणे आवश्यक आहे. पारंपरिक पिकांबरोबरच ज्वारी, बाजरी, तूर, मूग, उडीद आणि तीळ यांसारख्या कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य दिल्यास उत्पादनाचे नुकसान टाळता येऊ शकते. खरीप हंगामातील पेरणी करताना शेतकऱ्यांनी पावसाच्या आगमनानुसार टप्प्याटप्प्याने पेरणी करावी. बियाण्यांची प्रक्रिया करूनच पेरणी केल्यास रोगराईचा धोका कमी होऊन उगवण क्षमता वाढते. तसेच आंतरपीक पद्धतीचा अवलंब केल्यास हवामानातील अनिश्चिततेचा परिणाम कमी होण्यास मदत होते. सेंद्रिय खतांचा वापर, पीक अवशेषांचे आच्छादन (मल्चिंग), ठिबक व तुषार सिंचन प्रणालीचा अवलंब केल्यास मातीतील ओलावा टिकून राहून कमी पावसातही पिकांची वाढ चांगली होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

हवामान बदलाच्या काळात शेतकऱ्यांनी कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र आणि हवामान खात्याकडून दिल्या जाणाऱ्या हवामान आधारित कृषी सल्ल्याचे नियमित पालन करणे अत्यंत गरजेचे असल्याचे आमदार धस यांनी सांगितले. पावसात दीर्घ खंड पडल्यास जीवनरक्षक सिंचनाची व्यवस्था ठेवणे, पीक विमा योजनेचा लाभ घेणे आणि आपत्कालीन परिस्थितीसाठी पर्यायी नियोजन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. याचबरोबर कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र तसेच संबंधित यंत्रणांनी शेतकऱ्यांपर्यंत हवामान आधारित मार्गदर्शन, दर्जेदार बियाण्यांची उपलब्धता, पीक व्यवस्थापनाची माहिती आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञान वेळेत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचनाही आमदार सुरेश धस यांनी दिल्या आहेत.

एल निनो हा निसर्गातील एक आव्हानात्मक घटक असला तरी योग्य नियोजन, जलसंधारण, आधुनिक सिंचन तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक शेती पद्धतींचा अवलंब केल्यास त्याच्या परिणामांची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकते. शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार शेतीचे व्यवस्थापन करावे, असे आवाहन करत आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांना धीर दिला आणि आगामी खरीप हंगामासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

# जिल्हा परिषद शाळा पांढरीवर पालकांचा वाढता विश्वास खाजगी शाळांमधून २५ विद्यार्थ्यांनी घेतला प्रवेश

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांढरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात प्रवेशोत्सव, नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत, गणवेश व शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, पालकांचा उत्साह आणि शिक्षकांची तत्परता यामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

दि. १५ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास पांढरी गावचे सरपंच सुधीर आबा पठाडे प्रमुख उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थी, पालक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना सरपंच सुधीर आबा पठाडे यांनी शाळेच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, यावर्षीची सर्वात आनंदाची बाब म्हणजे जिल्हा परिषद शाळा पांढरी येथून एकही विद्यार्थी आष्टी किंवा इतर ठिकाणच्या शाळांमध्ये गेला नाही. उलट, शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे आणि शिक्षकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे खाजगी शाळांमधून इयत्ता दुसरी ते सातवीपर्यंतच्या वर्गांमध्ये तब्बल २५ विद्यार्थ्यांनी नव्याने प्रवेश घेतला आहे.

तसेच इयत्ता पहिलीसाठीही दरवर्षीच्या तुलनेत अधिक विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले असून,



पालकांचा जिल्हा परिषद शाळेकडे वाढता कल दिसून येत आहे. ही बाब शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, शिक्षकांचे समर्पित कार्य आणि पालकांनी दाखविलेल्या विश्वासाची पावती असल्याचे त्यांनी नमूद केले.

सरपंच पठाडे यांनी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षण समिती सदस्य, पालक आणि विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील राहील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमादरम्यान नवीन विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल उत्साह निर्माण झाला असून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी वातावरणात झाली.

पांढरी येथील जिल्हा परिषद शाळेने गेल्या काही वर्षांत शैक्षणिक गुणवत्ता, विविध उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिल्यामुळे पालकांचा विश्वास संपादन केला आहे. याच विश्वासाचे फलित म्हणून खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद शाळेकडे वळण्यास सुरुवात केली असून, ही बाब ग्रामीण भागातील शासकीय शिक्षण व्यवस्थेसाठी प्रेरणादायी आणि अभिमानास्पद मानली जात आहे.

# आष्टी येथील ड.बी.डी.हंबर्डे विधी महाविद्यालयाचा ९८.४८ टक्के निकाल

पहिल्याच बॅचचा दैदिप्यमान ठसा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ड. बी. डी. हंबर्डे विधी महाविद्यालय, आष्टी यांनी आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची ठोस छाप उमटवत यंदाच्या विधी (एल.एल.बी.) तीन वर्षी अभ्यासक्रमाच्या परीक्षेत तब्बल ९८.४८ टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. विशेष म्हणजे महाविद्यालय स्थापन झाल्यानंतरच्या पहिल्याच बॅचने हे दैदिप्यमान यश संपादन केल्याने संपूर्ण संस्थेसाठी हा अभिमानाचा आणि ऐतिहासिक क्षण ठरला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण आणि व्यावसायिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या या विधी महाविद्यालयाने अत्यंत कमी कालावधीत आपली स्वतंत्र आणि विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे. विद्यार्थीकेंद्री शिक्षणपद्धती, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन, नियमित अध्यापन आणि परीक्षाभिमुख तयारी यामुळे विद्यार्थ्यांनी यशाची नवी उंची गाठली आहे.

यंदाच्या निकालात अनेक विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन करून महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. त्यामध्ये अरुण चंद्रकांत गाढवे यांनी प्रथम क्रमांक मिळवून आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटविला. प्रणित प्रदीप पाटील यांनी द्वितीय क्रमांक पटकावला, तर अक्षय तुकाराम गाडे यांनी तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांची जिद्द, सातत्यपूर्ण परिश्रम, अभ्यासातील शिस्त आणि शिक्षकांचे मार्गदर्शन हे महत्त्वाचे घटक ठरले आहेत.

महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक ठरत असून नियमित व्याख्याने, अभ्यासमूल्यांकन, मार्गदर्शन वर्ग, चर्चासत्रे आणि परीक्षेपूर्व तयारी यांचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ झाला आहे. विधी शिक्षणासोबतच संविधानिक मूल्यांची जपणूक, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यावरही महाविद्यालय विशेष भर देत असल्याचे या यशातून अधोरेखित झाले आहे.

या उल्लेखनीय निकालाबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संघमित्रा जावळे, प्रा. फय्युम शेख, प्रा. शेख, प्रा. गर्जे तसेच लिपिक सौ. अश्विनी हंबर्डे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशीच प्रगती साधून विधी क्षेत्रात यशस्वी कारकीर्द घडवावी, भारतीय संविधानाविषयी निष्ठा राखावी आणि समाजात न्याय, समता व कायद्याचे अधिराज्य प्रस्थापित करण्यासाठी योगदान द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

संस्थेचे अध्यक्ष मा. किशोर नाना हंबर्डे, उपाध्यक्ष मा. दिलीप शेठ वर्धमाने, कोषाध्यक्ष मा. गणेश पिसाळ तसेच सर्व संचालक मंडळाने विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या भावी शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या संस्थेच्या ध्येयाला या यशामुळे अधिक बळ मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

विशेष म्हणजे, सन २०२३-२४ मध्ये एल.एल.बी. तीन वर्षी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेली ही पहिलीच बॅच सन २०२५-२६ मध्ये यशस्वीपणे बाहेर पडत आहे. त्यामुळे हा निकाल केवळ शैक्षणिक यश नसून नव्याने सुरू झालेल्या संस्थेच्या गुणवत्ता, नियोजन आणि शैक्षणिक बांधिलकीचे प्रतीक ठरला आहे.

पहिल्याच बॅचने मिळवलेले हे यश महाविद्यालयाच्या भविष्यातील प्रगतीची नांदी मानले जात असून, येणाऱ्या काळात विधी शिक्षण क्षेत्रात आष्टीचे नाव राज्यभर उज्ज्वल करण्याची क्षमता या संस्थेने सिद्ध केली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांच्या उज्ज्वल, यशस्वी आणि दैदिप्यमान भवितव्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# जो निर्भीडपणे, नि:पक्षपातीपणे आणि जनहितासाठी सत्य मांडतो

## तसेच पत्रकारितेचा वापर समाजसेवेसाठी करतो, तोच खरा पत्रकार

RNI व PRGI मार्फत नोंदणीकृत माध्यमांचा सन्मान व्हावा; मात्र केवळ गळ्यात कार्ड आणि वाहनावर PRESS लिहून पत्रकारितेचा आव आणणाऱ्या बोगस प्रवृत्तींना आळा बसणे ही काळाची गरज आहे. खरी पत्रकारिता ओळखपत्राने नव्हे, तर अधिकृतता, जबाबदारी आणि सत्यनिष्ठेने ओळखली जाते. खरा पत्रकार ओळखण्यासाठी केवळ गळ्यातील ओळखपत्र किंवा वाहनावरील PRESS स्टिकर पुरेसे नसते. त्याच्या कामाची पद्धत आणि नैतिकता महत्त्वाची असते. खऱ्या पत्रकाराची काही प्रमुख वैशिष्ट्ये १. सत्य आणि वस्तुनिष्ठता कोणतीही बातमी प्रकाशित करण्यापूर्वी तथ्यांची पडताळणी करतो.

अफवा किंवा अप्रमाणित माहिती पसरवत नाही.२. जनहिताला प्राधान्य

समाजातील महत्त्वाचे प्रश्न, अन्याय आणि लोकांच्या समस्या मांडतो.वैयक्तिक फायदा किंवा दबावासाठी पत्रकारिता करत नाही.३. दोन्ही बाजू ऐकतो एखाद्या वादग्रस्त प्रकरणात संबंधित सर्व पक्षांचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न करतो.४. नैतिकतेचे पालन

धमकी, खंडणी किंवा दबाव टाकून पैसे उकळण्याचा प्रयत्न करत नाही. पत्रकारितेचा गैरवापर वैयक्तिक स्वार्थासाठी करत नाही.५. ओळख आणि संलग्नता एखाद्या नोंदणीकृत वृत्तपत्र, न्यूज पोर्टल किंवा माध्यम संस्थेशी संबंधित असू शकतो.आवश्यक असल्यास स्वतःची अधिकृत ओळख सांगण्यास टाळाटाळ करत नाही.६. टीका स्वीकारण्याची तयारी

तथ्यपूर्ण चुका झाल्यास त्यांची दुरुस्ती करण्याची तयारी ठेवतो.फक्त या गोष्टींवरून पत्रकार समजू नये गळ्यात प्रेस कार्ड असणे.

गाडीवर PRESS लिहिलेले असणे.

सोशल मीडियावर न्यूज पेज चालवणे.

मोबाईलवर व्हिडिओ बनवणे.थोडक्यात

जो निर्भीडपणे, निःपक्षपातीपणे आणि जनहितासाठी सत्य मांडतो, तसेच पत्रकारितेचा वापर समाजसेवेसाठी करतो, तोच खरा पत्रकार. जसा राजकारण व्यापार सरकारी नोकरी यामध्ये साध्या भ्रष्टाचार बोकाळला आहे त्याची लागण पत्रकारिता क्षेत्राला सुद्धा लागली आहे.

### साईबाबा संस्थान कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा

# सापडलेले सोन्याचे टॉप्स संरक्षण कार्यालयात जमा

शिर्डी प्रतिनिधी:

श्री साईबाबा संस्थानच्या नवीन दर्शन इमारत येथे कार्यरत असलेल्या आरोग्य विभागातील कर्मचारी श्री. प्रसाद रवींद्र बिडवे यांनी प्रामाणिकपणाचे आदर्श उदाहरण घालून दिले आहे.

दिनांक १२/०६/२०२६ रोजी नवीन दर्शन इमारतीतील हॉल क्रमांक १० मध्ये साफसफाईचे काम सुरू असताना श्री. प्रसाद रवींद्र बिडवे यांना ०.७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे टॉप्स सापडले. या सोन्याच्या टॉप्सची अंदाजे किंमत रुपये १०,४४६/- इतकी असल्याचे सांगण्यात आले.

सदर मौल्यवान वस्तू सापडल्यानंतर कोणताही मोह न दाखवता श्री. बिडवे यांनी ते सोन्याचे टॉप्स प्रामाणिकपणे संरक्षण कार्यालयात जमा केले. त्यांच्या या प्रामाणिक कृतीमुळे श्री साईबाबा संस्थान परिसरात त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

साईबाबांच्या पवित्र भूमीत सेवा करताना प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि जबाबदारीची भावना जपणाऱ्या श्री. प्रसाद रवींद्र बिडवे यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# सायाळमध्ये बैलगाडीतून विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत; नवा शैक्षणिक उत्साह!

लोहा /प्रतिनिधी

लोहा नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी लोहा तालुक्यातील सायाळ येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे अत्यंत पारंपरिक आणि उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले. गावकऱ्यांच्या पुढाकारातून सजविलेल्या बैलगाडीतून विद्यार्थ्यांची काढलेली मिरवणूक आणि शाळेत केलेले औक्षण यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांच्या मनात शाळेबद्दल गोडी निर्माण व्हावी आणि त्यांचे मनोबल वाढावे, या उद्देशाने या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून फुलांनी सजविलेल्या बैलगाडीतून विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साही वातावरणात निघालेली ही मिरवणूक थेट जिल्हा परिषद शाळेपर्यंत पोहोचली. शाळेच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांचे औक्षण करून



आरती करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांना गोड खाऊ आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची गोड सुरुवात करण्यात आली आहे.

सायाळ येथील ही जिल्हा परिषद शाळा परिसरात आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रसिद्ध आहे. शाळेतील शिक्षक, विद्यार्थ्यांची जिद्द आणि गावकऱ्यांचा सक्रिय सहभाग यामुळे या शाळेने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. येथे 'गावाला शाळेचा आधार आणि शाळेला गावाचा आधार' हे सूत्र प्रत्यक्षात पाहायला मिळते.

विशेष म्हणजे, येथील शिक्षक सुट्टी किंवा वेळेची पर्वा न करता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी विशेष मार्गदर्शन करतात. या निष्ठेचे फळ म्हणून गेल्या दोन वर्षांत शाळेतील सुमारे २० विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी ठरले आहेत. शिक्षकांच्या या समर्पक वृत्तीमुळे पालकांचा जिल्हा परिषद शाळेवरील विश्वास अधिकच दृढ झाला आहे. याचाच परिणाम म्हणून यंदा शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी १७ नवीन विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेतला आहे.

या उपक्रमासाठी माजी सरपंच अण्णासाहेब पवार, छावाचे माऊली पवार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल शिंदे, सदस्य रामेश्वर पवार, रत्नाकर ढगे, गिरीधर पवार यांच्यासह शाळेतील शिक्षक काशिनाथ शिरसीकर, कल्पना मॅडम, बिराजदार मॅडम आणि गावातील नागरिक व पालकांनी विशेष परिश्रम घेतले. या अनोख्या स्वागतामुळे विद्यार्थ्यांचा पहिला दिवस संस्मरणीय ठरला असून, गावभर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले आहे.



नांदेड-तामसा रोडवरील पाटनूर परिसरात सोमवारी रात्री एका मादी बिबट्या व दोन बछडे पाणी पिण्यासाठी व्याकुळ झाले असल्यामुळे रस्त्यावरील पाणी पितान वाहन चालकांना दिसल्याने खळबळ उडाली. वनविभागाने वाहन चालकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन केले आहे.

## एम.एच - सी.ई.टी. मध्ये समर्थ संतोष डोणगे ची उज्वल कामगिरी

किनवट प्रतिनिधी दि.१६ : महाराष्ट्रातील अभियांत्रिकी प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या एम.एच-सी.ई.टी २०२६ परीक्षेत किनवट येथील समर्थ संतोष डोणगे याने ९८.६८ पर्सेंटाइल गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे समर्थ ने घरी राहून ऑनलाइन माध्यमातून फिजिक्स वालाच्या वर्गांच्या सहाय्याने अभ्यास करून हे यश मिळवले. समर्थ हा शेतकरी कुटुंबातील असून ही त्याच्या या कामगिरीमुळे किनवट तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, तो तालुक्यातील अव्वल विद्यार्थ्यांपैकी एक ठरल्याची चर्चा आहे.

समर्थ डोणगे च्या यशाबद्दल आ. भीमराव केराम, भाजपा नेते सुधाकर भोयर, इस्लापूर बाजार समितीचे सभापती शिवाजी घोगरे पाटील, घोटी सोसायटीचे प्रतिनिधी यशवंत कऱ्हाळे , कमठाला



सोसायटीचे प्रतिनिधी रामराव कऱ्हाळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष बाळू पाटील पवार, विधानसभा अध्यक्ष वैजनाथ करपुडे पाटील, शिवसेनेचे राम बुळे पाटील, शिवसेना तालुका प्रमुख मारुती दिवसे पाटील, उमाकांत कऱ्हाळे पाटील, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे गजानन पाटील सूर्यवंशी, संभाजी ब्रिगेड चे सचिन कदम पाटील यांच्यासह शिक्षक, मित्रपरिवार तसेच विविध स्तरांतून त्याचे अभिनंदन करण्यात येत असून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# अर्धापूर तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांची एनडीएला प्रेरणादायी भेट

## आम्हीही सैन्यात जाऊन देशसेवा करणार - विद्यार्थ्यांचा निर्धार

अर्धापूर (प्रतिनिधी): आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या मनात देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित करणारा एक प्रेरणादायी उपक्रम नुकताच पार पडला. भोई प्रतिष्ठान आणि अर्धापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'पुण्यजागर' प्रकल्पातील अर्धापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांची पुण्यातील जगप्रसिद्ध एनडीएला शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती.

अर्धापूर तालुक्यातील. आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी पुण्यजागर हा शैक्षणिक प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी एनडीएच्या सुमारे ७००० एकर परिसरात भूदल, नौदल आणि हवाई दलाच्या प्रशिक्षण व्यवस्थेची प्रत्यक्ष माहिती घेतली. विमाने, हेलिकॉप्टर, ड्रोन, अश्वदल तसेच विविध लष्करी साधने प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थी भारावून गेले.

भेटीदरम्यान एनडीएच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी अत्यंत आपुलकीने संवाद साधला. सैन्यदलातील कठोर प्रशिक्षण, शिस्त, देशसेवा आणि त्याग याविषयी माहिती देणारी चित्रफीतही विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. भारत-पाक युद्धातील विजयाचे प्रतीक म्हणून जतन करून ठेवलेला पाकिस्तानी ध्वज पाहून विद्यार्थ्यांनी भारतीय सैनिकांच्या शौर्याला मनोमन सलाम केला.

एनडीएच्या अत्याधुनिक मेसमध्ये



एका टेबलवर ठेवलेले जेवणाचे ताट आणि समोरची रिकामी खुर्ची पाहून विद्यार्थ्यांची उत्सुकता वाढली. त्यावेळी अधिकाऱ्यांनी युद्धात बेपत्ता झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ दररोज ते ताट ठेवले जाते, अशी माहिती दिली. ही भावना ऐकून उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षक भावूक झाले.

भेटीच्या शेवटी विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधताना, आमचे वडील आमच्यात नाहीत, पण आम्ही खूप अभ्यास करू आणि सैन्यात भरती होऊन तुमच्यासारखीच देशसेवा करू, असे सांगितले. विद्यार्थ्यांचा हा निर्धार ऐकून अधिकारीही गहिवरून गेले.

या उपक्रमाचे संयोजक, भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य युवा धोरण समितीचे मानद सदस्य डॉ. मिलिंद भोई यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांच्यात देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि देशसेवेची भावना रुजविणे हा या भेटीमागील मुख्य उद्देश होता. सेवा परमो धर्मः हा मंत्र जगणाऱ्या भारतीय सैन्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थिनी दुर्गा क्षीरसागर आणि नियती इंगोले यांनी एनडीएच्या परिसरातील पवित्र माती स्मृतिचिन्ह म्हणून सोबत घेतली. भाविक काशीहून गंगाजल घेऊन येतात, आम्ही भारतमातेच्या या पवित्र भूमीची माती घेऊन जात आहोत. एक दिवस एनडीएमध्ये प्रवेश मिळवून देशसेवा करू, असा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या उपक्रमासाठी भोई प्रतिष्ठानचे मार्गदर्शक भूषण गोखले, आर. एम. श्रीधरन, ब्रिगेडियर विनोद कुमार, लेफ्टनंट कर्नल दलजीत सिंग तसेच हेमंत गोसावी, विजय घाणेकर, प्रमोद परदेशी, मनोज चौधरी आणि चंद्रकांत दोमा यांनी विशेष सहकार्य केले.

## अंकुश नगर परिसरातील रस्त्यांची दुरवस्था



बीड /प्रतिनिधी

अंकुश नगर परिसरातील रस्त्यांची दुरवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. आज एका महिलेचा स्कूटीवरील ताबा रस्त्यावरील खड्ड्यामुळे सुटल्याने ती खाली पडून जखमी झाली. सुदैवाने, स्थानिक नागरिक भीमशक्ती सामाजिक संघटनेचे (युवा) जिल्हाध्यक्ष अमर माने यांनी तत्परता दाखवत जखमी महिलेला जखमी अवस्थेत उचलून तातडीने हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी सहकार्य केले.

घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी विद्यमान नगरसेवक यांचा वर तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेक वर्षांपासून रस्त्यावरील खड्ड्यांमुळे निर्माण झालेली धोकादायक परिस्थिती याबाबत वारंवार तक्रारी करण्यात आल्याचा दावा नागरिकांनी देखील केला. मात्र, संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, रस्त्यांची दुरुस्ती वेळेत झाली असती तर आज ही दुर्घटना घडली नसती. प्रशासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कामे करावीत.या घटनेमुळे अंकुश नगरातील नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, आणखी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी जोर धरत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास नागरिकांकडून आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

आज एक महिला जखमी झाली, उद्या एखाद्याचा जीव गेला तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. रस्त्यांच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे.

## बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यकारी सहाय्यकपदी निवड

प्रज्ञा जाधव-आठवले यांचा नागसेन बुद्धविहारात सत्कार

परळी । प्रतिनिधी

रविवार दि. १४ जून २०२६ रोजी नागसेन बुद्धविहार येथे आयुनी प्रज्ञा विशाल जाधव-आठवले यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यकारी सहाय्यक पदावर निवड झाल्याबद्दल परिसरातील बौद्ध उपासक-उपासिकांच्या वतीने उत्साहपूर्ण सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात जाधव-आठवले परिवारातील सदस्यांनी भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून केली. त्यानंतर आयु. एस. ए. सोणवणे यांनी बुद्धवंदना घेत कार्यक्रमाला आध्यात्मिक वातावरण प्राप्त करून दिले.

यावेळी उमाजी वाघमारे, प्रा. व्ही. आर.



गाडे, प्रा. आर. आर. डी. जाधव, ड. के. आर. गाडे तसेच माजी सरपंच मारुती सुरवसे यांनी आयुनी प्रज्ञा जाधव-आठवले यांचा शाल, पुष्पगुच्छ व सत्कारचिन्ह देऊन गौरव केला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या यशाचे कौतुक करत पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

आपल्या जिद्द, परिश्रम आणि गुणवत्तेच्या बळावर मिळविलेल्या या यशामुळे परिसरातील युवक-युवतींना प्रेरणा मिळेल, असा विश्वास वक्त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाची सांगता शरणयत्तने करण्यात आली. यावेळी नागसेन बुद्धविहार परिसरातील बहुसंख्य बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयुनी प्रज्ञा जाधव-आठवले यांच्या निवडीबद्दल उपस्थितांनी आनंद व्यक्त करत त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# देशात पावसाची ६४ टक्के तूट

## महाराष्ट्रासह १६ राज्यांत पावसाची प्रतीक्षा



**मुंबई : भारतात नैऋत्य मोसमी पावसाचा वेग मंदावला आहे. सोमवार, १५ जून रोजीच्या उपग्रह प्रतिमांमध्ये देशाच्या मोठ्या भागावर मोसमी ढगांचा अभाव दिसून आला. हवामान विभागाच्या मते, ४ ते १५ जून दरम्यान देशात सरासरी ५३.७ मिमी पाऊस पडायला हवा होता, परंतु केवळ १९.२ मिमी पाऊस झाला, ज्यामुळे पावसाची ६४ टक्के तूट निर्माण झाली आहे. मोसमी पावसाच्या मंदावण्यामुळे राजस्थान, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्लीसह १६ राज्यांमध्ये पावसाची प्रतीक्षा वाढली आहे. दक्षिण भारतातून पुढे सरकल्यानंतर, मोसमी पाऊस महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशच्या आसपास थांबला आहे. ईशान्येकडील राज्यांमधून पुढे सरकल्यानंतर, तो बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये थांबला आहे.**

कोकणात आल्यानंतर थांबलेल्या मान्सूनमध्ये प्रगती होण्याची आशा असतानाच सॅटेलाईटने टिपलेल्या छायाचित्रांनी काहीसी चिंता वाढवली आहे. उपग्रहाच्या फोटोंमध्ये मान्सून भारतातून पूर्णपणे गायब झाल्यासारखा दिसत आहे. देशाच्या दक्षिण आणि मध्य भागात मोसमी पाऊस पोहोचल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच पावसाच्या गतीमध्ये मोठी घसरण झाली आहे. १५ जून रोजी 'इन्सॅट-३डीएस' या उपग्रहाने टिपलेल्या फोटोंमध्ये ही परिस्थिती अधिकच स्पष्टपणे समोर आली आहे. सक्रिय मान्सूनशी संबंधित असलेला ढगांचा मोठा थर दिसण्याऐवजी, बहुतांश द्वीपकल्पीय आणि मध्य भारतात आकाश असामान्यपणे निरभ्र दिसत आहे. ढगांची मुख्य हालचाल हिमालय, ईशान्य भारत आणि इंडो-गंगेच्या खोऱ्यात उत्तरेकडील भागांवर केंद्रित झाली आहे. दुसरीकडे अरबी समुद्रातील मान्सूनची शाखाही कमकुवत आणि विखुरलेली दिसत आहे.

मागील काही दिवसांमध्ये मान्सूनने कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि मध्य भारताच्या काही भागांत प्रगती केली असली, तरी हा वेग चिंता वाढावी इतका मंदावला आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, मूळ कारण आजूबाजूच्या समुद्रातील आर्द्रतेच्या कमतरतेची नसून, जमिनीपासून काही किलोमीटर वर (उच्च वातावरणात) सुरू असलेल्या मोठ्या प्रमाणावरील संघर्षाचे आहे. या समस्येच्या केंद्रस्थानी पश्चिमेकडून वाहणारा वेगवान वायू प्रवाह आहे. उच्च वातावरणातील हा वेगाने वाहणारा हवेचा प्रवाह नेहमीपेक्षा खूपच दक्षिणेकडे सरकला आहे. या असामान्य बदलामुळे पूर्वेकडून वाहणार वेगवान वायू सक्रिय होण्यात अडथळा येत आहे, जो भारतातील मान्सूनचे चक्र टिकवून ठेवण्यासाठी मुख्य इंजिन म्हणून काम करतो.





## सर सय्यद अहमद खान व पिपल्स माध्यमिक शाळेत पहिल्या दिवसाच्या स्वागताचा उत्सव

बीड (प्रतिनिधी) : नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सर सय्यद अहमद खान व पीपल्स सेकंडरी स्कूल येथे 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील शाळेचा पहिला दिवस संस्मरणीय ठरावा आणि शिक्षणाबाबत त्यांच्यामध्ये उत्साह निर्माण व्हावा, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके वितरित करून नव्या शैक्षणिक वर्षाची आनंददायी सुरुवात करण्यात आली. स्वागताच्या या उत्सवी वातावरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

प्रवेशोत्सव यशस्वी करण्यासाठी शाळेचे सचिव शेख वकील सर, शेख अखिल सर, मुख्याध्यापिका मोमीन रेश्मा बेगम, मोमीन इम्रान सर, अफसर सर, आदम सर, मोमीन तौसिफ सर, मोमीन राजी सर, सय्यद अरफात सर, आमिर खान सर, तनसीर मॅडम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नियमित शिक्षण, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व सांगत नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची आनंददायी सुरुवात झाली.